cmyk

## संपादकीय

### प्रदूषणाचे भयान टोक...

विषारी वायूमुळे दोन दिवसांत आपल्याला संसर्ग होतो. सलग तीन दिवस मी दिल्लीमध्ये थांबू शकत नाही,' असे दस्तुरखुद्द केंद्रीय रस्ते वाहतूक विकास व परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. गडकरी यांच्या या विधानावरून दिल्लीच्या प्रदूषणाची तीव्रता लक्षात यायला हरकत नाही. दिल्लीच्या प्रदूषणात ४० टक्के वाटा हा वाहनांचा आहे.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४२ | मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# साखरेच्या एमएसपीमुळे कारखाने अडचणीत; दर वाढवण्यासाठी ठोठावणार दार

पुणे । प्रतिनिधी

**केंद्र सरकारने मागील ७ वर्षांपासून साखरेच्या एमएसपीमध्ये वाढ न केल्यामुळे साखर कारखान्यांचे उत्पन्न कमी झाले आहे. उसाच्या एफआरपीमध्ये वाढ होत आहे पण साखरेचे दर वाढत नसल्यामुळे अनेक साखर कारखान्यांना साखर विक्रीच परवडत नाही. त्यामुळे साखर कारखाने अडचणीत सापडले आहेत. याकडे केंद्र सरकारने लक्ष घालावे, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी केली.**

पुण्यात सोमवारी (दि. २९) पार पडलेल्या वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटच्या (व्हीएसआय) वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांनी या मागणीला अनुसरून साखरेचा विक्री दर वाढविण्याबरोबरच साखर उद्योगातील इतर प्रश्नांसाठी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा केली जाईल असे आश्वासन दिले. पाटील पुढे म्हणाले की, यंदाचा ऊस



गाळप हंगाम चांगला चालू असून आत्तापर्यंत देशात ११५ लाख मेट्रीक टन उसाचे गाळप झाले आहे. पण मागील ७ वर्षांपासून देशात साखरेचे दर ३१ रूपयांवर अडून आहेत. मागील सात वर्षांपासून दरवर्षी उसाच्या एफआरपीमध्ये वाढ होत आहे पण साखरेच्या एमएसपीमध्ये मात्र वाढ होताना दिसत नाही. त्यामुळे साखर कारखाने अडचणीत येत आहेत. साखरेचा ▶▶ पान २ वर

### एफआरपीसाठी लिंकअप फॉर्म्युला

प्रत्येक भागातील शेतकऱ्यांना उसाचे चांगले पैसे मिळावेत यासाठी आम्ही एक लिंकअप फॉर्म्युला ठरवत आहोत. यामध्ये साखरेचा एमएसपी, इथेनॉल उत्पादन आणि त्याचा दर व सीबीजी या गोष्टी लक्षात घेत शेतकऱ्यांना एफआरपी देण्यात येईल असा हा फॉर्म्युला असल्याची माहिती पाटील यांनी दिली.

## थोडक्यात...

### राष्ट्रपतींचा आयएनएस वाघशीर मधून प्रवास

मुंबई : भारतीय सशस्त्र दलांच्या सर्वोच्च कमांडर आणि भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अरबी समुद्रात आयएनएस वाघशीर या पाणबुडीतून प्रवास करत एक नवा इतिहास रचला. कर्नाटकच्या कारवार नौदल तळावरून त्यांनी या मोहिमेला सुरुवात केली. सुमारे दोन तास चाललेल्या या सफरीदरम्यान राष्ट्रपतींनी समुद्राच्या खोलीत जाऊन नौदलाच्या सायलेंट आर्म म्हणजेच पाणबुडी विभागाच्या कार्यक्षमतेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. पाणबुडीतून प्रवास करणाऱ्या द्रौपदी मुर्मू या भारताच्या दुसऱ्या राष्ट्रपती ठरल्या आहेत. यापूर्वी माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी असा प्रवास केला होता. या ऐतिहासिक प्रसंगी नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के. त्रिपाठी त्यांच्यासोबत उपस्थित होते. स्वदेशी बनावटीच्या कलवरी श्रेणीतील या पाणबुडीवर राष्ट्रपतींचे आगमन होणे, हे भारतीय नौदलाच्या आत्मनिर्भरतेचे प्रतीक मानले जात आहे.

### घराणेशाहीचा वरचष्मा, कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर

मुंबईः आगामी मुंबई महापालिका निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी जाहीर केलेल्या पहिल्या उमेदवारी यादीत 'घराणेशाही'चे स्पष्ट दर्शन घडते आहे. शिवसेना (ठाकरे गट), भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आणि काँग्रेस या सर्वच प्रमुख पक्षांनी सामान्य कार्यकर्त्यांऐवजी नेत्यांच्या नातेवाईकांना झुकते माप दिले आहे. ठाकरे गटाने ६, भाजपने ४, राष्ट्रवादीने ३ तर काँग्रेसने २ नातेवाईकांना मैदानात उतरवले आहे. यामध्ये सुनील प्रभू, विनायक राऊत, नवाब मलिक, अस्लम शेख, राहुल नार्वेकर, किरिट सोमय्या यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या मुला-मुलींना, भावंडांना व सुनेला उमेदवारी मिळाली आहे. लोकसभा व विधानसभेत पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये यामुळे तीव्र असंतोष पसरला असून, आम्ही आयुष्यभर फक्त सतरंज्याच उचलायच्या का? असा संतप्त सवाल निष्ठावान कार्यकर्त्यांकडून विचारला जातो आहे.

### बांगलादेशात हिंसाचार सुरूच

नवी दिल्लीः बांगलादेशात हिंदूंवरील हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहेत. दीपू चंद्र दास आणि अमृत मंडल यांच्या निर्घृण हत्येनंतर आता पिरोजपूर जिल्ह्यातील पलाश कांती साहा यांची निर्घृण हत्या झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. भाजप नेते अमित मालवीय यांनी ही माहिती सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर शेअर केली आहे. अमित मालवीय यांच्या म्हणण्यानुसार, पिरोजपूर जिल्ह्यातील दुमुरिया गावात इस्लामी कट्टरपंथीयांनी हिंदूंच्या घरांवर हल्ले केले. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, हल्लेखोरांनी पलाश कांती साहा यांना त्यांच्या घरात कोंडून घराला आग लावली. या घटनेचा व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत असून त्यात घर जळताना आणि बाहेर उभे असलेले लोक रडताना दिसत आहेत. मालवीय यांनी पुढे सांगितले की, याच जिल्ह्यातील पिरोजपूर सदर भागातील पश्चिम दुमुरीतला गावात या घटनेच्या अवघ्या एक दिवस आधी दोन हिंदू कुटुंबांची पाच घरे जाळण्यात आली होती.

### सिगरेटच्या एका स्टिकसाठी मोजावे लागणार ७२ रुपये

दिल्लीः देशातील तंबाखू शौकिनांना केंद्र सरकारने मोठा धक्का दिला. संसदेने 'सेंट्रल एक्साइज (संशोधन) विधेयक, २०२५' मंजूर केले असून, यामुळे सिगरेट, सिगार, हुक्का आणि खैनीवरील उत्पादन शुल्कात प्रचंड वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे तंबाखूजन्य पदार्थांच्या किमती आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाण्याची शक्यता आहे. नवीन दुरुस्तीनुसार, सिगरेटवरील उत्पादन शुल्क प्रति १,००० स्टिकमागे २००-७३५ रुपयांवरून थेट २,७०० ते ११,००० रुपयांपर्यंत वाढवण्यात आलेय. ही वाढ सिगरेटच्या प्रकारावर आणि लांबीवर अवलंबून असेल. खैनीवरील शुल्क २५% वरून १००% पर्यंत, तर हुक्का तंबाखूवर २५% ऐवजी ४०% कर आकारला जाईल. सरकारी अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, सध्या बाजारात १८ रुपयांना मिळणारी एक सिगरेट लवकरच ७२ रुपयांना मिळण्याची शक्यता आहे. वित्त राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी हे विधेयक सादर केले होते.

## सेंगरला जामीन देण्यास सवोच्च न्यायालयाचा विरोध

दिल्ली । वृत्तसंस्था

**उन्नाव बलात्कार प्रकरणातील दोषी कुलदीप सिंह सेंगरला सर्वोच्च न्यायालयाने मोठा झटका दिला. सर्वोच्च न्यायालयाने भाजपचा माजी आमदार कुलदीप सेंगरला दिलासा देणारा दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयावर स्थगिती दिली आहे. न्यायालयाने याबाबत टिप्पणी करताना सेंगरवरचे आरोप गंभी असल्याचे सांगितले.**

अशा गुन्हेगाराला कोणत्याही प्रकरणात जामीन मिळू नये. चीफ जस्टिस सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील बेंचने सेंगरच्या वकिलांना नोटीस पाठवली असून दोन आठवड्यात उत्तर देण्यास सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयात आता याबाबतची पुढची सुनावणी ही चार आठवड्यानंतर



होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीच्या सुरूवातीलाच स्फष्ट केलं की आम्ही सध्याच्या घडीला उच्च न्यायालयाच्या निर्णयावर स्थगिती आणण्याच्या बाजूने आहोत. या सुनावणीत युक्तीवाद हा फक्त स्टे च्या मुद्द्यावरच होईल. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात अंतिम निर्णय देणार नसल्याचे स्पष्ट केले. यावर कुलदीप सेंगरच्या विकालांनी हस्तक्षेप ▶▶ पान २ वर

## अजितदादा...भिमकन्येला डावलणं बरं नव्हं !

बीड प्रतिनिधी

**राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बीड शहरात सहकार संकुलाच्या भूमिपूजनाचा भव्य शासकीय कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मात्र, या पहिल्याच अधिकृत कार्यक्रमात बीड नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष तथा शहराच्या प्रथम नागरिक प्रेमलता पारवे यांना थेट निमंत्रण पत्रिकेतून वगळण्यात आल्याने खळबळ उडाली आहे. अजितदादा.... भिमकन्येला डावलणं बरं नव्हं, असे म्हणत नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे तर यावरून राजकीय आरोपही होवू लागले आहेत.**

### नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांना शासकीय कार्यक्रमाचे निमंत्रण नाही; शहराच्या प्रथम नागरिकाला डावलल्याने संताप



प्रोटोकॉलनुसार नगराध्यक्षांचे नाव निमंत्रण पत्रिकेत अग्रक्रमाने असणे अपेक्षित असताना, राष्ट्रवादी काँग्रेसच्याच नवनिर्वाचित नगराध्यक्षांना डावलण्यात आल्यामुळे हा प्रकार अधिकच गंभीर मानला जात आहे. सध्या ही निमंत्रण पत्रिका बीड जिल्ह्यासह शहरात चर्चेचा आणि संतापाचा विषय ठरली आहे. नगराध्यक्ष हे शहराचे घटनात्मक पद असून, पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शासकीय कार्यक्रमात त्यांना वगळणे म्हणजे थेट लोकशाही मूल्ये आणि प्रशासकीय संकेत पायदळी तुडवण्याचा प्रकार असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर अजित पवार ▶▶ पान २ वर

## जानेवारीपासून रेशन धान्य वाटपात पुन्हा बदल

### ज्वारीचे वितरण होणार बंद



पुणे । प्रतिनिधी

शिधापत्रिकाधारकांना नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यांत गव्हाबरोबरच ज्वारीचे वितरण करण्यात आले होते. यात गहू, ज्वारी आणि तांदळाचा पुरवठा केला आहे. नववर्षात रेशनवर ज्वारी बंद होणार असून, धान्य वाटपात पुन्हा एकदा बदल केला आहे. त्यामुळे आता ▶▶ पान २ वर

## खोपोली हत्याकांडाचे बीड कनेक्शन समोर!

मुंबई । प्रतिनिधी

सध्या सर्वत्र माजी नगरसेवर मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येची चर्चा सुरु आहे. मंगेश काळोखे हे रायगड जिल्ह्यातील खोपोली गावातील शिवसेना शिंदे गटाच्या नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. मंगेश यांच्यावर ५ ते ६ हल्लेखोरांनी तलवारीने जवळपास १९ ते २० वार करुन त्यांची हत्या केली. आता या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. या हत्येचे बीडमधील वाल्मीक कराड याच्याशी कनेक्शन असल्याचे आमदार महेंद्र थोरवे यांनी सांगितले आहे.

आमदार महेंद्र थोरवे यांनी

### गुन्हेगाराचा वाल्मीक कराड गँगशी संबंध असल्याची चर्चा





मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. तसेच त्यांनी या प्रकरणाचे बीड कनेक्शन काय आहे हे सांगितले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी रवी देवकर याचा बॉडीगार्ड हा बीडचा असल्याचे सांगितले आहे. तसेच या बॉडीगार्डने जवळपास १९ वार करुन ▶▶ पान २ वर

## गुन्हा नोंद असूनही आरोपी मोकाट

### बीडच्या पोलीस यंत्रणेला हायकोर्टाची नोटीस

छ. संभाजीनगर। प्रतिनिधी

साबलखेड (ता. आष्टी) येथील अनुसूचित जातीतील महिलेवर झालेल्या गंभीर मारहाणीप्रकरणी गुन्हा नोंद होऊनही आरोपीस अटक न झाल्याने अखेर प्रकरण मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथिल खंडपीठात पोहोचले असून, न्यायालयाने पोलीस अधिक्षक बीड, जिल्हादंडाधिकारी बीड व पोलीस निरीक्षक अंभोरा यांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.



साबलखेड येथील रहिवासी आशा महादेव साबळे या २० ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास शिवारात शेळ्या चारत असताना काही शेळ्या चुकून दादासाहेब आनंदा देसाई यांच्या शेतात गेल्या. यावेळी दादासाहेब देसाई यांनी मोटारसायकल शेळयांच्या अंगावर घालत दहशत निर्माण केली. याचा जाब विचारला असता त्यांनी आशा साबळे यांना उचलून जमिनीवर आदळले, ज्यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. घटनेची चौकशी करण्यासाठी गेलेल्या आशा साबळे यांचे पती महादेव साबळे यांना देखील आरोपीने जातीवाचक शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलीस स्टेशन अंभोरा येथे ▶▶ पान २ वर

## अनंत अंबानी साईचरणी नतमस्तक

### शिर्डी संस्थानला दिली ५ कोटी रुपयांची भरघोस देणगी

शिर्डी । प्रतिनिधी

देशातील दिग्गज उद्योगपती मुकेश अंबानी यांचे सुपुत्र अनंत अंबानी यांनी सोमवारी शिर्डीत येऊन श्री साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. या भेटीदरम्यान त्यांनी साईबाबा संस्थानला ५ कोटी रुपयांची मोठी देणगी अर्पण केली आहे. नाताळच्या सुट्ट्या आणि सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी शिर्डीत भक्तांची



मांदियाळी असतानाच अंबानी यांनी ही हजेरी लावली.

अनंत अंबानी यांचे सोमवारी शिर्डीत आगमन झाले. ▶▶ पान २ वर

## दहा हजाराची लाच घेताना भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिक पकडला

### जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

बीड । प्रतिनिधी

शेत जमिनीची मोजणी फाईल निकाली काढण्यासाठी केज भूमी अभिलेख कार्यालयातील लिपिकास दहा हजाराची लाज घेताना जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली. यावेळी त्याच्या घराची झाडती घेण्यात आली.

केज येथील भूमी अभिलेख उपाधीक्षक कार्यालयातील लिपिक माणिक अण्णासाहेब वाघमारे याने तक्रारदार शेतकऱ्यांकडून जमिनीची हद्द कायम करण्यासाठी ३०००० रुपयाची लाचेची मागणी केली होती. शेतकऱ्याने दिलेल्या तक्रारीनुसार सोमवार दिनांक २९ डिसेंबर रोजी या तक्रारीची पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान या लिपिकाने ३०००० रुपयाची लाच मागितल्याची ▶▶ पान २ वर

## कल्याण-बीड-लातूर जनकल्याण महामार्ग ६ जिल्ह्यातून जाणार

पुणे । प्रतिनिधी

**मुंबई ते मराठवाडा प्रवास हा खूप सोपा होणार आहे. कल्याण-लातूर जनकल्याण महामार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाने द्रुतगती महामार्ग बांदण्याचा निर्णय घेतला आहे. या महामार्गामुळे मुंबई, लातूरसह अनेक जिल्ह्यांना फायदा होणार आहे. अनेक जिल्ह्यातून हा महामार्ग जाणार आहे. या महामार्गाला राज्य सरकारनेही मंजुरी दिली आहे. यानंतर एमएसआरडीसीने सरेखनाच्या कामाला सुरुवात केली आहे.**



कल्याण-लातूर जनकल्याण महामार्ग ठाणे, पुणे, अहिल्यानगर, बीड, धाराशीव आणि लातूर या सहा जिल्ह्यातून जाणार आहे. सहा जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना हा महामार्ग जोडला जाणार आहे. एमएसआरडीसीचा हा प्रस्तावित महामार्गाला मंजुरीचे काम गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होते. त्यानंतर आत जनकल्याण महागामार्गाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे. आता संपूर्ण मराठवाड्याचा विकास होणार आहे. त्यामुळे या महामार्गाला जनकल्याण असे नाव दिले आहे. या महामार्गाचे सरेखन पूर्ण होण्यास काही दिवस लागणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु होईल. कल्याण - लातूर महामार्ग कल्याण, माळशेज घाट, बीड, मांजरसूंबा ▶▶ पान २ वर



## ई-केवायसी करण्यास मुदतवाढ मिळण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत राज्यातील लाखो महिलांना ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सुरुवातीला ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत असून, अजूनही सुमारे ४५ लाख महिलांनी ही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. त्यामुळे शासनाकडून एक महिन्याची मुदतवाढ देऊन ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय होण्याची शक्यता आहे. योजनेच्या अधिकृत माहितीनुसार, ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२९ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| धान्य (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २३.०० क्विंटल | २,९५० | २,९५० | २,४५७ |
| ज्वारी/हायब्रिड : २८.५० क्विंटल | २,४०० | ४,८५० | ३,०२६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १९.०० क्विंटल | ५,२०० | ६,८०० | ६,०२१ |
| उडीद : १२.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५१.०० क्विंटल | २,००० | ४,९०१ | २,९९७ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,३०१ | ६,३०१ | ६,३०१ |
| सोयाबीन: ११.५० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |

cmyk

## अग्रलेख

# प्रदूषणाचे भयान टोक...

विषारी वायूमुळे दोन दिवसांत आपल्याला संसर्ग होतो. सलग तीन दिवस मी दिल्लीमध्ये थांबू शकत नाही,' असे दस्तुरखुद्द केंद्रीय रस्ते वाहतूक विकास व परिवहनमंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. गडकरी यांच्या या विधानावरून दिल्लीच्या प्रदूषणाची तीव्रता लक्षात यायला हरकत नाही. दिल्लीच्या प्रदूषणात ४० टक्के वाटा हा वाहनांचा आहे. तथापि, भारतात दरवर्षी २२ लाख कोटी रुपये किमतीचे जीवाश्म इंधन परदेशातून आयात करावे लागते. त्यामुळे प्रदूषणात आणखी भर पडते, याकडेही गडकरी यांनी लक्ष वेधले आहे. हे पाहता धूर ओकणाऱ्या वाहनांचा प्रश्न किती जटील आहे, हे लक्षात येते.

मागच्या काही वर्षांत जीवाश्म इंधनासाठी अनेक पर्याय पुढे आले आहेत. त्यात प्रामुख्याने सीएनजीवरील व इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश होतो. त्यादृष्टीने दिल्ली व इतर शहरांमध्ये सीएनजीवरील वाहनांचा वापरही सुरू झाला आहे. तसेच इलेक्ट्रिक वाहनेही मोठ्या प्रमाणात बाजारात आली आहेत. परंतु, त्याला तितकासा प्रतिसाद मिळताना दिसत नाही. इलेक्ट्रिक वाहने ही महागडी आहेत. त्यांच्या किमती अव्वाच्या सव्वा आहेत. शिवाय बॅटरी चार्जिंगची प्रक्रियाही वेळखाऊ व जटील आहे. मुख्य म्हणजे इलेक्ट्रिक वाहने बंद पडण्याचे प्रकार वारंवार घडतात. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहने वापरण्यापेक्षा पूर्वी चालले आहे, तसेच चालू द्या, अशी लोकांची मानसिकता होताना दिसते. गडकरी यांनी आपण स्वत: इथेनॉलवरील वाहन वापरत असल्याचे सांगितले. त्यांचे प्रयत्न प्रामाणिक असतात. यात कोणताही संदेह नाही. परंतु, अजून याबाबतीत लोकांमध्ये काही गैरसमज आहेत, ते खरे तर दूर व्हायला हवेत. त्याचबरोबर इतर इंधनांचे पर्याय वाढविण्याची मानसिकता जनमानसात निर्माण करणे आवश्यक असेल. दिल्लीत मेट्रो हा खरेतर चांगला व प्रदूषण टाळणारा पर्याय. परंतु, मेट्रोतील तुडुंब गर्दीमुळे मर्यादा पडतात, हे लक्षात घ्यावे लागेल. मेट्रोचा विस्तारही आवश्यक असून, त्यादृष्टीने केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय महत्त्वाचा होय. दिल्ली मेट्रोच्या १२ हजार १५ कोटी रुपयांच्या विस्तारीकरण प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. येत्या तीन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार असून, यातून प्रदूषणमुक्तीला हातभार लागेल, असे मानले जाते. हे पाहता हा प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे लागेल. दिल्लीतील प्रदूषणप्रश्नी उच्च न्यायालयानेही राज्य सरकारवर कडक ताशेरे ओढले आहेत. राज्यातील जनतेला शुद्ध हवा उपलब्ध करून द्या, असे खडसावतानाच एअर प्युरिफायरसारख्या उपकरणांवरील वस्तू व सेवाकर कमी करण्यात यावा, असे कान न्यायालयाने टोचले आहेत. सध्या दिल्लीतील हवामानाची स्थिती आणीबाणीची. येथील वातावरण श्वसनासह इतर आजारांना आमंत्रण देणारे आहे. माणसाला दिवसातून २१ हजार वेळा श्वास घ्यावा लागतो. म्हणजे त्याच्या शरीरात किती विषारी कण जात असतील, त्याला सीमा नाही. असे असताना एअर प्युरिफायरवरील जीएसटी कमी करायला हवा, असे न्यायालयाला सरकारला सांगावे लागते, हे काही बरे नव्हे. मुळात राजधानीतील हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी सरकारने सर्वतोपरी प्रयत्न करायला हवेत. पण, या पातळीवर फार काही होताना दिसत नाही. दिल्लीत केजरीवाल यांचे सरकार असताना सत्ताधारी भाजपकडून याप्रश्नी त्यांच्यावर टीकेचे आसूड ओढले जायचे. प्रदूषणाला केजरीवाल हेच कसे जबाबदार आहेत, याची मांडणी केली जायची. आज दिल्लीत रेखा गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार आहे. परंतु, परिस्थितीत काहीही फरक पडलेला नाही. खरे तर केंद्रात व राज्यात दोन्हीकडे भारतीय जनता पक्ष सत्तेवर आहे. त्यामुळे समन्वयाचा अभाव असण्याचे काही कारण नाही. हे पाहता तात्पुरत्या व कायमस्वरुपी अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना गतीने करायला हव्यात.

दिल्ली ही देशाची शान आहे. जगभरातील राजकारणी, उद्योजक व इतर मंडळी तेथे येत असतात. परंतु, तेथील वातावरणच खराब असेल, तर देशाकडे पाहण्याचा संबंधितांचा दृष्टीकोन काय होऊ शकतो, याचा विचार केला पाहिजे. जी अवस्था दिल्लीची तीच मुंबई, कोलकाता, कानपूर, पुणे यांसह देशातील विविध महानगरांची. जगातील टॉप टेन शहरांमध्ये मुंबईचा समावेश कधीच झाला आहे. दिवसेंदिवस सर्वच शहरांमधील स्थिती ढासळते आहे. हे पाहता प्रदूषणाचा आलेख कमी करण्यासाठी आणि पर्यावरण जतन व संवर्धन करण्यासाठी आपल्याला गांभीर्याने प्रयत्न करावे लागतील. केवळ विकासदरात वाढ हे विकासाचे मापक नाही. देशातील हवामान आणि आरोग्य कसे आहे, यातूनही खरा विकास अधोरेखित होत असतो, हे आपण विसरू नये.

## गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटसमध्ये शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी कार्यशाळांचे आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

**गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसोबतच मानसिक आरोग्य व वैयक्तिक विकासाला चालना देण्यासाठी मानसिक आरोग्यावर आधारित द्वितीय कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले.सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ व प्रेरणादायी वक्ते डॉ.अशोक मते यांनी या दोन्ही कार्यशाळांमध्ये मार्गदर्शन केले.**

महाविद्यालयातील शिक्षकांसाठी 'ईमोशन मेंटल अवेरनेस' या विषयावर विशेष सेमिनार घेण्यात आला.या सेमिनारमध्ये डॉ. अशोक मते यांनी भावनिक बुद्धिमत्ता, ताणतणाव व्यवस्थापन, सकारात्मक विचारसरणी, अध्यापनातील मानसिक संतुलन तसेच विद्यार्थी-शिक्षक नातेसंबंध अधिक सुदृढ कसे करता येतील,याबाबत सखोल मार्गदर्शन केले.आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षकांवर असणारा मानसिक ताण ओळखून त्यावर मात करण्यासाठी भावनांची योग्य जाणीव आणि व्यवस्थापन किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून प्रकाश टाकला. परिस्थितीत शिक्षकांनी या सेमिनारला अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक असल्याची प्रतिक्रिया दिली.तसेच विद्यार्थ्यांसाठी "इम्प्रोविंग फोकस ॲन्ड मेमरी पॉवर" या विषयावर स्वतंत्र प्रेरणादायी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.या सत्रात डॉ. अशोक मते यांनी एकाग्रता वाढविण्याच्या प्रभावी पद्धती, स्मरणशक्ती सुधारण्यासाठीचे सोपे उपाय, अभ्यासातील सातत्य,वेळेचे योग्य नियोजन आणि मोबाईल व डिजिटल व्यत्ययांपासून दूर राहण्याचे महत्त्व विशद केले. विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने मानसिक स्थैर्य व एकाग्रता किती महत्त्वाची आहे,हे त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले.विविध कृती, उदाहरणे व संवादात्मक शैलीमुळे विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून आला.

# मठाधिपती शिवाजी महाराज, चेअरमन बाबुराव बोत्रे पाटलाच्या हस्ते होणार गेवराई येथील कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन

## पुरस्कार वितरणासं माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, मनोज जरांगे पाटील विजयसिंह पंडितांची उपस्थिती उपस्थिती

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १८ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेदरे स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ०१ ते ०५ जानेवारी दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड रोड वरील आठ एकर विस्तारणीय दसरा मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले आसल्याची माहिती आयोजन समितीचे मुख्य संयोजक महेश बेदरे, स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर , कार्याध्यक्ष अजय भैय्या दाभाडे , पुरस्कार समिती प्रमुख राजेंद्र आतकरे मुख्य संयोजक महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान कृषी विकास प्रतिष्ठान वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेश बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन ओंकार साखर कारखाना यांचा विशेष सहभाग या प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात तब्बल २०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहेत. दि १ जानेवारी गुरुवार रोजी दुपारी १:०० वा. महंत शिवाजी महाराज ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. तर प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री बदामराव पंडित, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून युवा नेते बाळराजे पवार यांची विशेष उपस्थिती असणार , प्रमुख पाहुणे म्हणून गेवराईच्या नगराध्यक्ष गीता भाभी पवार , मुख्याधिकारी विक्रम मांडूरगे, जिल्हा कृषी अधीक्षक सुभाष साळवे,गेवराई चे तहसीलदार संदीप खोमणे , तालुका कृषी सचिन गिरी, आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तर दि २ रोजी विविध तज्ज्ञांची चर्चासत्र होणार आहे दि. ४ जानेवारी रविवार रोजी दुपारी २.३० वाजता कृषिरत्न पुरस्कार वितरण सोहळा व भव्य शेतकरी मेळावा होणार आहे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण साहेब यांच्या हस्ते होणार आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब हे असणार आहेत या शेतकरी मेळाव्याला विशेष उपस्थिती गेवराई चे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित, संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे उपस्थित राहणार आहेत तर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेसाहेब देशमुख, काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस आदित्य दादा पाटील यांची उपस्थिती लाभणार आहे तर प्रमुख पाहुणे म्हणून हे उपस्थित राहणार आहेत दि. ३ जानेवारी रोजी एकदिवसीय पशुप्रदर्शन ५ जानेवारी रोजी समारोप सोहळा होणार आहे. या तर विविध शेती विषयावर चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार असून वरील सर्व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप होणार आहे. तरी या प्रदर्शनाचा तालुक्यासह जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने संयोजक कृषिभूषण महेश बेदरे, स्वागताध्यक्ष बप्पासाहेब तळेकर ,निमंत्रक शिनु भाऊ बेद्रे , कार्याध्यक्ष अजय दाभाडे भाउसाहेब शिंदे ,स्वागत समिती प्रमुख , मान्यवर स्वागत समिती प्रमुख, राजेंद्र बेदरे, नियोजन समिती प्रमुख राजेंद्र मोटे , व्यवस्थापन समिती प्रमुख राजाराम पवार , प्रसिद्धी प्रमुख भागवत जाधव, विनोद पौळ , चर्चासत्र समितीप्रमुख सतीश केसभट, पशुप्रदर्शन समिती प्रमुख संभाजी जाधव आदींनी केले आहे.


# मुंगुसवाडे येथे हनुमानमुर्ती वर्धापन दिन, श्रीराम मंदिर भूमिपुजन व गुरुशिष्य भेट

## त्रिवेणी संगम कार्यक्रमाचे आयोजन

**उत्सव वार्ता । छगन मुळे**

**अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्याच्या सीमेवर असणाऱ्या मुंगूसवाडे येथील दशनाम सन्मास महातील श्री गुरु परंपरेतील ११ वे महंत स्वामी शुक्लभारती बाबा यांना दिक्षा देणारे श्री १००८ सचिव महानिर्वानी आखाडा कणखल हरिद्वार येथील विजय गिरीजी महाराज यांची गुरु-शिष्य भेट तब्बल सव्वा दोन तपानंतर मठाचे उत्तराधिकारी संतोष भारती हे घडवून आणण्याचा अप्रतिम कार्यक्रम दि.३० व ३१ डिसेंबरला साजरा होत आहे. अर्थात औचित्य आहे संस्थानच्या इनामातील हनुमान मुर्ती प्रतिष्ठापनेचा ६ वा वर्धापन दिन व श्रीराम प्रभु मंदिर भूमिपुजन सोहळ्या निमित्त या गुरु-शिष्य भेटीचा दुग्धशर्करा योग म्हटल्यास वावगे ठरणार नाही. यावेळी मिरवणूक, प्रवचन, कीर्तन व महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे.**

मुंगुसवाडे येथील या दशनाम संन्यास मठाची फार मोठी व प्राचीन श्रीगुरु परंपरा आहे. येथील प्रथम महंत ब्रम्हलिन परमहंस यतीचंद्र चुडामणी परीव्राजकाचार्य श्री-१००८ श्री स्वामी लाला भारती बाबाजी, महंत श्री स्वामी गणेश भारती, ब्र.महंत श्री काशी भारती, ब्र.महंत स्वामी अर्जुन भारती, ब्र.महंत स्वामी राम भारती, ब्र.महंत स्वामी अंकुश भारती, ब्र.महंत स्वामी गैब भारती, ब्र.महंत स्वामी गोपाल भारती, ब्र.महंत स्वामी श्रावण भारती, ब्र.महंत स्वामी सोम भारती, या परंपरेत सध्याचे महंत स्वामी शुक्ल भारती बाबा मठाधिपती असून ते गुरुपरंपरेतील अकरावे असून त्यांचे उत्तराधिकारी म्हणू २०२० मध्ये आखाड्याचे सभापती महंत उमाशंकरजी बाबा यांच्या हस्ते चादर कार्यक्रम होऊन महंत संतोष भारती बाबा आज उत्तराधिकारी म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. या दशनाम संन्यास मठाचे मठाधिपती महंत शुष्कभारती बाबा यांनी आळंदी येथे शिक्षण घेतल्यानंतर १९९८ ला आखाड्यात श्री श्री १००८ सचिव पंचायत महानिर्वाणी आखाडा कणखल हरिद्वार येथे विजय गिरी बाबा यांचेकडून दिक्षा घेतली व त्यानंतर ते मुंगुसवाडे येथील दशनाम संन्यास मठाचे मठाधिपी म्हणून विराजमान झाले त्यांनी मठाचा कारभार सांभाळत परिसरात सांप्रदायाचा प्रचार व प्रसार करीत आपली वेगळी ओळख निर्माण केली, तर पंचक्रोशी बरोबरच आखाडा परिवारात आपली स्वतंत्र छाप निर्माण करीत त्यांनी संतोष भारती यांना अचूक हेरलं. वयाच्या ९ व्या वर्षी १९८६ मध्ये आखाड्यातील दिक्षा घेतलेल्या संतोष भारतींना महंत शुक्लभारतींनी आपल्या बरोबर आणून जवळपास १० वर्षे सानिध्यात ठेवत वाढवलं आणि घडवलंही. त्यानंतर दशनाम संन्यास मठाच्या इनामी जमिनीत असणाऱ्या हनुमान मंदिराचा जीर्णोदार करुन भव्य अशा मंदिरात २०२० मध्ये हनुमान मुर्ती प्रतिष्ठापनेनिमित्त भव्य दिव्य असा यज्ञ याग विधी करुन आखाड्यातील अनेक महंत मंडळीच्या उपस्थितीत सोहळा पार पाडला. तर याच वेळी संतोष भारती यांचा चादर कार्यक्रम करुन आखाड्याचे सभापती उमाशंकरजी बाबा यांचे हस्ते करवून मुंगूसवाडे दशनाम संन्यास मठाचे उत्तराधिकारी म्हणून घोषीत करण्यात आले. दशनाम संन्यास मठाचे मठाधिपती महंत शुक्ल भारती बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली व आज्ञेबरहुकूम संतोष भारती बाबा गेल्या पाच वर्षांपासून उत्कृष्ट कार्य करीत असून त्यांनी इनाम मध्ये जणू नंदनवन फुलवले आहे. तर आपल्या कार्यकुशलतेमधून संस्थानचा नावलौकिक वाढवण्याचे कार्य करीत आहेत. सध्या होत असलेल्या परिसरातील धार्मिक कार्याबरोबरच पुणे-मुंबईपर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करुन संतोष भारती बाबा आखाड्याच्या परंपरेचे तंतोतंत पालन करीत संप्रदायाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. आज संपन्न होत असलेल्या या हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन व व श्रीराम मंदिर भूमिपुजन सोहळा हे औचित्य असून विशेष कार्यक्रम म्हणजे अप्रतिम व अपवादात्मक होणारा असा गुरु-शिष्य भेटीचा कार्यक्रम आहे.



गुरु-शिष्य परंपरेत बहुधा शिष्य गुरुंच्या भेटीला जात असतीलही परंतु या कार्यक्रमाच्या निमित्ताने गुरु-शिष्याच्या भेटीला येत आहेत हे विशेष. कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री १००८ सचिव महानिर्वाणी आखाडा कणखल हरिद्वार उत्तराखंड यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असले तरी मठाधिपती शुक्ल भारती बाबांची व त्यांची २७ वर्षानंतर भेट होत असून जणू परंपरेतील तिसरी पिढी त्यांची भेट करवीत आहे ही गुरुशिष्य परंपरेतील आनंदाची व अभिमानाची बाब म्हणावी लागेल. नव्हे तो एक परंपरेतील एक आदर्शच म्हटल्यास वावगे ठरणार नाही. या दोन दिवसीय कार्यक्रमात दि.३० डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता १००८ सचिव पंचायत महानिर्वाणी आखाडा कणखल हरिद्वार विजय गिरीजी महाराज यांचे मुंगुसवाडे येथील माऊली मंदिर संभाजीनगर येथे आगमन होईल तर येथून त्यांची भव्य शोभायात्रा निघून ती दशनाम संन्यास मठात विसर्जीत होईल. तर दि.३१ रोजी संस्थानच्या इनाम येथील पावन हनुमान परिसरात सकाळी ८ ते ९ ह.भ.प.दयानंद महाराज कोरेगावकर यांचे प्रवचन तर ९ ते ११ महंत योगीराज महाराज रामगडकर यांचे सुश्राव्य असे कीर्तन होईल. त्यानंतर प्रमुख अतिथी व मान्यवरांचे हस्ते श्रीराम मंदिराचे भूमिपुजन करण्यात येणार आहे. यामुळे या परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. संस्थान इनामात होत असलेल्या या हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन तसेच श्रीराम मंदिर भूमिपुजन सोहळा, प्रवचन, कीर्तन व महाप्रसादाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा अस आवाहन महंत शुष्कभारती बाबा, उत्तराधिकारी महंत संतोष भारती बाबा व मुंगूसवाडे ग्रामस्थांच्या वतिने करण्यात आले आहे.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### साखरेच्या एमएसपीमुळे कारकाने

एमएसपी न वाढल्यामुळे सद्या साखरेच्या दरात आणि उसाच्या दरात २०० ते ३०० रूपयांचा गॅप तयार झाला आहे. सध्या आम्ही उसासाठी ३ हजार ते ३ हजार १०० रूपये प्रतिटन दर देत आहोत. पण काही कारखान्यांना ते शक्य नाही. कारण त्यांच्याकडे उपपदार्थ तयार होत नाहीत. ज्या साखर कारखान्यांचे बायप्रोडक्ट जास्त आहेत अशा साखर कारखान्यांना जास्त दर देणे परवडते असेही ते म्हणाले. या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही साखरेचा उत्पादन खर्च काढला. तर हा खर्च ४० रूपये ३४ पैसे एवढा आला. म्हणून केंद्र सरकारने साखरेसाठी ४० रूपये ३४ पैसे एवढा एमएसपी करावा अशी मागणी आम्ही केली होती अशीही माहिती पाटील यांनी यावेळी दिली.

-----------

### अजितदादा...भिमकन्येला

यांचा जातीवादी चेहरा पुन्हा एकदा उघड झाल्याचा आरोप राजकीय व सामाजिक वर्तुळातून केला जात आहे. सत्ताधारी गटातीलच लोकप्रतिनिधीला अशा पद्धतीने डावलणे म्हणजे सत्तेचा माज आणि निवडकांना प्राधान्य देण्याचे राजकारण असल्याची टीका होत आहे. हा प्रकार केवळ निमंत्रणातील चूक नसून, जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष आहे का? असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. बीडच्या प्रथम नागरिकांचा असा अपमान झाल्यास सामान्य जनतेला काय न्याय मिळणार, असा रोषही व्यक्त केला जात आहे. या प्रकरणावर प्रशासन आणि संबंधित नेत्यांकडून अद्याप अधिकृत स्पष्टीकरण आलेले नसले, तरी हा वाद आगामी काळात बीडच्या राजकारणाला नवी दिशा देणार, हे मात्र निश्चित.

-----------

### सेंगरला जामीन देण्यास

करण्याची परवानगी मागितली. त्यावर कोर्टानें नोटीस जारी करत दोन आठड्यांनी उत्तर सादर करण्यास सांगितले. कोर्टाने स्पष्ट सांगितले की, सेंगरला जेलमधून बाहेर सोडण्यात येणार नाही. चीफ जस्टिस सूर्य कांत यांनी कुलदीप सिंह सेंगरला न्यायालयांनी दोषी ठरवल्याचे सांगितले. पीडितेच्या वकिलांनी पीडित कुटुंबीयाला अजूनही धोका आहे. त्यावर सूर्य कांत यांनी तुम्हाला न्यायालयात याचिका दाखल करण्याचा अधिकार आहे, असे सांगितले. तुमच्याकडे कायदेशीर मार्ग उपलब्ध आहेत. कुलदीप सिंह सेंगरच्या वकिलाने चीफ जस्टिस यांना सांगितले की उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींचे फोटो व्हायरल केले जात आहेत. यावर बोलताना सूर्य कांत यांनी हे दुर्दैवी असल्याचे सांगितले. आम्हाला माहिती आहे की लोक याचा राजकीय फायदा उचलण्याचा प्रयत्न करत आहेत. व्यवस्थेला धमकावण्याचा प्रयत्न करू नये. ते म्हणाले की, तुम्ही या सर्व गोष्टी रस्त्यावर आणू शकत नाही. कोर्टाच्या आत चर्चा करा आता पुढची सुनावणी ही पुढच्या महिन्यात होईल.

-----------

### गुन्हा नोंद असूनही

आशा साबळे यांनी तक्रार दिल्यानंतर वैद्यकीय उपचार करून २१ ऑक्टोबर २०२५ रोजी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला. मात्र, गुन्हा नोंद होऊनही आरोपीस अटक न झाल्याने तसेच आरोपीकडून सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याने आशा साबळे व ग्रामस्थांनी १० नोव्हेंबर व २४ नोव्हेंबर २०२५ रोजी पोलीस अधिक्षक, जिल्हादंडाधिकारी व पोलीस निरीक्षक अंभोरा यांना लेखी निवेदन देऊन तातडीने अटक करण्याची मागणी केली होती. मात्र या निवेदनांवर कोणतीही कार्यवाही न झाल्याचा आरोप आहे. या निष्क्रियतेविरोधात आशा महादेव साबळे यांनी ॲड. फारुकी कमालोद्दीन एन. यांच्या मार्फत मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात फौजदारी रिट याचिका दाखल केली. या याचिकेवर २३ डिसेंबर २०२५ रोजी माननीय न्यायमूर्ती संदीपकुमार सी. मोरे व माननीय न्यायमूर्ती वा. जी. खोब्रागडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली असता, संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश देण्यात आले. या प्रकरणाची पुढील सुनावणी १३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. फारुकी कमालोद्दीन एन. तर शासनाच्या वतीने ॲड. बी. बी. गुंजाळ यांनी काम पाहिले.

------------

### खोपोली हत्याकांडाचे बीड

मंगेश काळोखे यांची हत्या केल्याचा दावा देखील केला आहे. तसेच त्याचे बड्या नेत्यांशी एकदम जवळचे संबंध असल्याचा खळबळजनक आरोप देखील महेंद्र थोरवे यांनी केले आहेत. मी आल्यानंतर मंगेशच्या परिवाराने मला धक्कादायक माहिती सांगितली. जो रवी देवकर यांचा बॉडीगार्ड आहे (महेश धायतडक) त्यांनी मंगेशवर तेरा वार एकट्याने केले आहेत. तो जो बॉडीगार्ड आहे तो वाल्मीक कराडचा साथीदार आहे आणि वाल्मीक कराडच्या बरोबर त्याच्या पेजवर त्याचे नाव आहे. धनंजय मुंडे सोबत गडावरचे देखील त्याचे फोटो आहेत. तो वॉन्टेड आहे. रवी देवकर यांनी खास हत्या करण्यासाठी त्याला या ठिकाणी आणलेला होता. हे सर्व राष्ट्रवादी कनेक्शन आहे. धनंजय मुंडे, वाल्मीक कराड आणि हा रवी देवकर यांनी आणलेला बॉडीगार्डची मंगेशची क्रूर हत्या करण्यामध्ये समावेश आहे, असे आमदार महेंद्र थोरवे म्हणाले.

-------------

### जानेवारीपासून रेशन

गहू ३ किलो आणि तांदूळ २ किलो मिळणार आहे.

मागील दोन महिने अंत्योदय योजनेंतर्गत प्रत्येकी पाच किलो गहू व पाच किलो ज्वारी, तसेच २५ किलो तांदूळ देण्यात आला. तर प्राधान्य कुटुंबांना यापूर्वी मिळणाऱ्या दोन किलो गहू व तीन किलो तांदळाऐवजी एक किलो गहू व एक किलो ज्वारीचे वितरण केले होते. म्हणजेच, पूर्वीच्या गहूऐवजी गहू व ज्वारीचे संयुक्त वाटप केले होते. नोव्हेंबरपासून लाभार्थ्यांना ज्वारी मिळत होती. जानेवारीपासून धान्य वाटपात पुन्हा बदल केले जाणार आहे. दरम्यान, राज्यातील रेशनधारकांसाठी नववर्षात महत्त्वाचा बदल होणार आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय व प्राधान्य कुटुंब योजनांमधील नवीन धान्यप्रमाण पुन्हा लागू करण्यात येणार आहे. जानेवारी २०२६ पासून अंत्योदय योजनेत २१ किलो गहू व १४ किलो तांदूळ, असे एकूण ३५ किलो धान्य मिळणार आहे. प्राधान्य कुटुंब योजनेत प्रत्येकी दरमहा दोन किलो तांदूळ व तीन किलो गहू दिला जाणार आहे.

-------------

### दहा हजाराची लाज घेताना भूमी

पुष्टी करण्यात आली. त्यापैकी पाच हजार रुपये वाघमारे यांनी पूर्वीच स्वीकारले होते. उर्वरित २५००० रुपयांपैकी दहा हजार रुपये स्वीकारताना आरोपीला तहसील कार्यालयासमोर रोडवर एका चहाच्या टपरी समोर सापळा रचून रंगेहात पकडण्यात आले. यावेळी अंगझडतीमध्ये लाचीची रक्कम दहा हजार रुपये, इतर रोख पाच हजार पाचशे रुपये, मोबाईल, दोन अंगठ्या हस्तगत करण्यात आल्या. दरम्यान आरोपीच्या धाराशिव येथील निवासस्थानाची झडती घेण्यात आली. याप्रकरणी केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी कांगणे, अप्पर पोलीस अधीक्षक शशिकांत शिनगारे ,यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शरदचंद्र रोडगे, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उपाधीक्षक बाळू जाधवर, तपास अधिकारी समाधान कवडे, गजानन घायवट, गजानन खरात, गजानन कांबळे ,चालक विठ्ठल कापसे आदिंनी केली.

-------------

### अनंत अंबानी साईचरणी

त्यांनी सायंकाळच्या वेळी साईबाबांच्या मंदिरात जाऊन समाधीचे दर्शन घेतले आणि श्रद्धापूर्वक धूप आरतीला उपस्थिती लावली. परंपरेनुसार, त्यांनी साईबाबांच्या समाधीवर निळ्या रंगाची शाल अर्पण केली. दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांच्या हस्ते अनंत अंबानी यांचा साईबाबांची मूर्ती आणि शाल देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थानचे इतर अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबानी कुटुंब हे साईबाबांचे भक्त म्हणून ओळखले जाते. नीता अंबानी आणि आकाश अंबानी न चुकता वर्षातून दोन ते तीन वेळा शिर्डीत दर्शनासाठी येत असतात. अनंत अंबानी यांचीही साईबाबांवर मोठी श्रद्धा असून, त्यांनी यापूर्वी २५ ऑक्टोबर २०२२ रोजी देखील शिर्डीत येऊन दीड कोटी रुपयांची देणगी दिली होती. यावेळी मात्र त्यांनी ५ कोटी रुपयांची भरघोस देणगी देत आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. सध्या नाताळच्या सुट्ट्या आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी शिर्डीत देश-विदेशातून लाखो भाविक दाखल होत आहेत. भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता साई संस्थानने दर्शनासाठी जय्यत तयारी केली असून, पोलीस प्रशासनाकडूनही मंदिर परिसरात चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. अशा गर्दीच्या वातावरणातही अनंत अंबानी यांनी शिर्डीत हजेरी लावून साईबाबांचे दर्शन घेतले.

-------------

### ई-केवायसी करण्यास

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण न केल्यास १ एप्रिल २०२६ पासून लाभ थांबू शकतो. मात्र, ही मुदतवाढ मिळाल्यास लाभार्थी महिलांना अधिक वेळ मिळेल. अधिकृत पोर्टलवर ई-केवायसी ऑनलाइन करता येते. योजनेच्या लाभार्थींना नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा १,५०० रुपयाचा हप्ता अद्याप मिळालेला नाही. काही अहवालांनुसार, नोव्हेंबर-डिसेंबर एकूण ३,००० हा लाभ एकत्रितपणे जानेवारीमध्ये जमा होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी जानेवारीसह तीन महिन्यांचा म्हणजेच ४,५०० रुपयांचा हप्ता एकदम मिळण्याची चर्चाही आहे. योजनेच्या निकषांनुसार, कुटुंबप्रमुख (पती किंवा वडील) नसलेल्या महिलांची माहिती स्वतंत्रपणे संकलित केली जाणार आहे. यासाठी विशेष संकेतस्थळ/पोर्टल तयार करण्यात आले आहे. अशा महिलांना शिफारस पत्र किंवा इतर पुरावा सादर करून ई-केवायसी पूर्ण करता येईल. यामुळे विधवा, घटस्फोटित किंवा एकल महिला लाभार्थींना सोयीचे होईल. दरम्यान, लाडक्या बहिणींनी तातडीने ई-केवायसी पूर्ण करावी. अधिक माहितीसाठी स्थानिक महिला व बालविकास कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

-----------

### कल्याण-बीड-लातूर

येथून पुढे लातूरला जाणार असल्याचे पुढे आले आहे. त्यानंतर शेवटी महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागात हा महामार्ग जाणार आहे. यामुळे उल्हासनगर, जुन्नर, अहिल्यानगर, आष्टी, पाटोदा, बीड, केज, कळंब, लातूर, निलंगा येथून हा महामार्ग जाणार आहे. यामुळे ठाणे, बीड, धाराशीव अशा अनेक जिल्ह्यांना फायदा होणार आहे.

-------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. ३० डिसेंबर २०२५



# सावित्रीबाई फुले यांनी प्रत्येक स्त्री मनात क्रांतीची मशाल पेटविली - डॉ.नागेश गवळी

बीड । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती (महिला), बीड यांच्या वतीने आयोजित ''सावित्री उत्सव २०२५२६'' अंतर्गत दि.२८/१२/२०२५ रोजी विविध सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक कार्यक्रम अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडले. या सर्व उपक्रमांना महिलांचा मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त सहभाग लाभला.

सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रसार व्हावा, स्त्री शिक्षण, आरोग्य व सामाजिक जागृतीला चालना मिळावी या उद्देशाने समितीने नियोजनबद्ध पद्धतीने उत्सवाचे आयोजन केले होते. उत्सवाच्या काळात महिलांनी पुढाकार घेत संपूर्ण कार्यक्रमांचे प्रभावी व्यवस्थापन केले.

उत्सवांतर्गत आयोजित डॉ.नागेश गवळी यांच्या प्रबोधनात्मक व्याख्यान कार्यक्रमास डॉ.योगेश क्षीरसागर, ॲड.सुभाष राऊत, कल्याण आखाडे, ॲड.सतीश शिंदे, मा.किशोर राऊत, नितीन साखरे ,शुभम धूत यांनी उपस्थिती दर्शवून मार्गदर्शन केले. डॉ.नागेश गवळी यांच्या विचारप्रवर्तक व्याख्यानाने उपस्थितांना सामाजिक भान आणि प्रेरणा मिळाली.

रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. सारिका क्षीरसागर, सावित्री साखरे व मंजू धूत यांनी उपस्थित राहून शिबिरास शुभेच्छा दिल्या. जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या शिबिरात डॉ. राजश्री चौधरी, डॉ. पूनम शिंदे, डॉ. सुषमा भोपळे, डॉ. वैशाली साळुंके, डॉ. शीतल भोपळे व डॉ. किरण काळे या तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांची आरोग्य तपासणी करून योग्य मार्गदर्शन केले याप्रसंगी महिलांनी व अनेक नागरिकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.निबंध स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.सचिन परदेशी (मराठी विभाग, बलभीम



महाविद्यालय, बीड) यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले. वृक्षारोपण कार्यक्रमास मा.ॲड.राजेंद्र राऊत, गणेश मोहोळकर यांनी उपस्थित राहून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.रांगोळी स्पर्धेसाठी रोहिणी मस्के व राजश्री सद्दिवाल यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले तसेच यावेळी दिपालीताई किशोर धोत्रे, सुरेखा वचिष्ठ धोत्रे (प्रभाग क्र.२) व महाबली सेवा परिवार सामाजिक संस्था बीड यांनी या वेळी फराळ, पानी बॉटल आणि चहा वाटप करून उपस्थितांची सेवा केली.

सावित्री उत्सवाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण आयोजन महिलांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरीत्या पार पडले. यामध्ये अध्यक्ष श्रीमती अलका शिंदे (राऊत), उपाध्यक्ष श्रीमती साधना भोपळे, सचिव श्रीमती डॉ.वैशाली साळुंके, सहसचिव श्रीमती नंदा साळुंके व कोषाध्यक्ष श्रीमती पूजा लांडगे यांनी नियोजन व अंमलबजावणीत मोलाची भूमिका बजावली. दिनांक ०३.०१.२०२६ रोजी सकाळी ०७.३० वाजता महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा येथे अभिवादन सोहळा तसेच दुपारी ३ वाजता श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिर सावता माळी चौक बीड ते महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळा पर्यंत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे वरील कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी जयंती समिती व समस्त महिला मंडळ यांनी केलेले आहे. उत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात आले. तसेच दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या जयंतीदिनीचे सर्व कार्यक्रम याच उत्साहात व व्यापक स्वरूपात पार पडावेत, अशा शुभेच्छाही उपस्थित मान्यवरांनी दिल्या.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक जयंती उत्सव समिती (महिला), बीड यांच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होत असून सावित्रीबाई फुले यांचा विचार कृतीत उतरवण्याचे कार्य सातत्याने सुरू असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## थोडक्यात



### वीर बाल दिवस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत साजरा

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने वीर बाल दिना निमित्त पालकांचा वीर बालक म्हणून सन्मान करण्यात आला. वीर बाल दिना निमीत्त वीर बालकाचा सन्मान धारूर येथील शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थेचे वतीने करण्यात आला यावेळी ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील हसनयन शहानवाब कुरेशी व शुभ्रा परमेश्वर रोडगे या दोन विद्यार्थ्यांचा वीर बाल युवक म्हणून गौरव करण्यात आला यावेळी शिल्प निर्देशक शेख जे यु, शिल्प निर्देशक एस वी घोळक, शिल्प निर्देशक पी एस मुळे व इतर कर्मचारी उपस्थित

### जिल्हा परिषदचा आदर्श शिक्षक पुरस्कार अरुण जायभाये यांना जाहीर

**तलवाडा । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा तलवाडा येथील माध्यमिक शिक्षक जायभाय अरुण बाबुराव, हे तेरा वर्षा पासुन तलवाडा जि,प, शाळेत कार्यरत आहेत नेहमी हसमुख स्वाभाव शांत समय आहे, आपल्या शिक्षणाच्या माध्यमातून अनेक विद्यार्थी जायभाय सर यांनी घडविले आहे. शाळेत कोणताही कार्यक्रमात लेझीम पथकचे ते प्रमुख असतात लेझीम पथकाच्या माध्यमातून ते मान्यवरांचे मन जिगतात एक नवाजलेले गुरुजी आहे. २०२४ चा बीड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक विजय डोंगरे,व सर्व शिक्षक वृद्धांच्या वतीने, तलवाडा येथील आजी माजी लोकप्रतिनिधीच्या , नातेवाईक, मित्र परिवाराच्या वतीने शुभेच्छा वर्षाव होत आहे. या पुरस्काराचे वितरण सोहळा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या हस्ते दिं. ३१ डिसेंबर रोजी बीड येथे होणार आहे.त्यानिमित्त सर्व नातेवाईक मित्र परिवार, शिक्षक वृंद ,या सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन जायभाय अरूण सर, यांनी केले आहे.



### वडवणी येथे श्री संत भगवान बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री संत भगवान बाबा यांच्या ६९ व्या पुण्यतिथी सोहळा च्या कार्यक्रमाचे खालील प्रमाणे आयोजन केले आहे.




शनिवार दि.०३/०१/२०२६ रोजी सायं. ५:३० ते ६:०० वा हरिपाठ व सायं. ८:३० ते १०:३० पर्यंत श्री. ह.भ.प.महादेव महाराज जाधव यांचे सुश्राव्य कीर्तन होईल व ११ ते १ वाजेपर्यंत हरीजागर होईल व रविवार दि.०४/०१/२०२६ रोजी पहाटे ४ ते ६ काकडा आरती, सकाळी ९ ते १० अभिषेक व पुजा नंतर ११ ते १ या वेळेत श्री. ह.भ.प.योगेश महाराज काननावकर यांचे पुण्यतिथी निमित्त हरीकीर्तन होईल व त्यानंतर महाप्रसाद होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी कीर्तनाचा व महाप्रसादाचा आवश्य लाभ घ्यावा ही विनंती.

अन्नदातेः गोवर्धनराव धुले, संत भगवानबाबा प्रतिष्ठान वडवणी.

मृदुंगाचार्य: सर्वश्री ह.भ.प. बाबूराव महाराज सौदणे, रंगनाथ देवकते, मोहनराव राख, दराडे महाराज. व्यवस्था: अंगद महाराज फड, विश्वनाथ नागरगोजे, घुले परिवार, मंडप व्यवस्था जय हनुमान मंडप वडवणी.

भजनी मंडळी श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली वारकरी शिक्षण संस्था वडवणी. आचारी मंडळ राठोड परमेश्वर, महादेव राऊत, ठिकाण: संत भगवानवाचा मंदिर परिसर साळींबा रोड वडवणी, ता. वडवणी, जि. बीड मो. ७४४७८७४५८७,९८९०५३२१४५

## बाळासाहेब नागरगोजे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निवड

### मराठी साहित्याच्या सर्वोच्च व्यासपीठावर मांडली जाणार ऊसतोड कामगारांची व्यथा

पाटोदा । प्रतिनिधी

साताऱ्याच्या ऐतिहासिक भूमीत १ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पाटोदा तालुक्यातील जि.प. माध्य.शाळा थेरला येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक बाळासाहेब नागरगोजे यांची साहित्यिक प्रतिभेच्या आधारे प्रतिष्ठित संमेलनातील कविकट्टा व्यासपीठावरुन कविता सादर करण्यासाठी निवड झाली आहे.



महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे(शाखा शाहूपुरी ) व मावळा फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुल,सातारा येथे हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.ज्येष्ठ साहित्यिक 'पानिपतकार' विश्वास पाटील हे संमेलनाध्यक्ष असून,संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे.समारोपाप्रसंगी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रघुवीर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले हे आहेत.

बाळासाहेब नागरगोजे यांना शालेय जीवनापासूनच वाचन व लेखनाची आवड आहे.लोकमत वर्तमानपत्रासह विविध वर्तमानपत्रे व दिवाळी अंकातून त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (महाराष्ट्र शासन ) यांच्या अनुदानातून त्यांचा 'युध्द पेटले आहे ' हा कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. अत्यंत अल्प कालावधीत हा कवितासंग्रह महाराष्ट्रभर दखलपात्र ठरला आहे. 'युध्द पेटले आहे' हा कवितासंग्रह तळागाळातील वंचित घटकांच्या व्यथांचा आक्रोश प्रभावीरित्या व्यक्त करतो.याच कवितासंग्रहातील 'साखर' या ऊसतोड कामगारांवरील कवितेची निवड संमेलनातील अनुभवी साहित्यिकांनी केली आहे. बाळासाहेब नागरगोजे यांच्या कवितेला मिळालेला हा सन्मान ही पाटोदा तालूका व बीड जिल्ह्यासाठीसुद्धा गौरवाची बाब आहे. अखिल भारतीय स्तरावरील या मानाच्या साहित्यिक व्यासपीठावर थेरला गावातील कवीची निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सुधाकर शेंडगे,ज्येष्ठ कवयित्री प्रा.ललिता गादगे,प्रा.डॉ.वीरा राठोड, एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक साहित्यिक श्री. अनंत कराड सर, प्रा.समाधान इंगळे,साहित्यिक परशुराम सोंडगे, साहित्यप्रेमी, शिक्षकवृंद,अधिकारी वर्ग,थेरला गावाचे सरपंच श्री.चंद्रकांत (बापू) राख, उपसरपंच व ग्रामस्थांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## पान ६ वरुन...

### तहसीलदार शेळके मोरगावला

या निमित्ताने विविध प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि समाधान हा या उपक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला. बैठकीनंतर एका ज्येष्ठ ग्रामस्थाने भावूक होत सांगितले , '' आयुष्यात पहिल्यांदाच तहसीलदार आमच्या गावात येऊन आमच्याशी बसले आणि बांधावर जाऊन प्रश्न पाहिले . आज वाटतं सरकार खरंच जवळ आलं आहे. एका शेतकऱ्याने म्हटले , '' आधी कार्यालयात फेऱ्या माराव्या लागायच्या . आज मात्र प्रश्न सांगितला आणि लगेच जागेवर पाहणी झाली. या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी स्पष्ट केले की , शासनाचे आदेश , वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि स्थानिक पातळीवरील प्रामाणिक अंमलबजावणी या तिन्हींची सांगड घातली तरच सुसाशन प्रत्यक्षात उतरते . प्रशासन म्हणजे फक्त फाईल्स नव्हेत , तर लोकांच्या आयुष्याशी जोडलेली जबाबदारी आहे , असे त्यांनी ठामपणे सांगितले. बैठकीच्या शेवटी ग्रामस्थांनी तहसीलदार शेळके तसेच संपूर्ण महसूल यंत्रणेचे आभार मानले . मोरगाव येथे झालेली ही पाहणी आणि बैठक प्रशासन आणि जनतेतील अंतर कमी करणारी ठरली असून , प्रशासन जर थेट गावात उतरले , तर समस्यांवर उपायही तिथेच सापडतात , हा विश्वास गावकऱ्यांमध्ये दृढ झाला आहे.

### शृंगेरी देवी यात्रा उत्सवास

आलेले भव्य कुस्त्यांचे मैदान. या दंगलीमध्ये राज्यातील नामवंत मल्ल सहभागी होणार आहेत. कुस्ती शौकिनांसाठी ही मोठी पर्वणी ठरणार आहे.ग्रामस्थ आणि ट्रस्टच्या वतीने यात्रेची जय्यत तयारी सुरू असून, भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे.शृंगेरी देवीच्या या पावन उत्सवासाठी आणि कुस्त्यांच्या मैदानात सहभागी होण्यासाठी राज्यभरातील मल्लांनी तसेच भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन शृंगेरी देवी ट्रस्टचे अध्यक्ष विजय हराळ यांनी केले आहे.

### अवैध वाळू उपसा करणाऱ्या

असलेली ०१ ब्रास वाळु किंमत ६,०००/- रु व वाळु भरणेसाठी वापरलेली पिवळ्या रंगाची जेसीबी मशिन किं. २६,००,०००/- रु असा एकुण ३४,०६,०००/- रु चा मुद्देमाल जप्त केला असुन उपरोक्त दोन्ही आरोपी यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके, उपविभाग गेवराई, पोलीस निरीक्षक किशोर पवार, सपोनि/दिपक लंके यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस उपनिरीक्षक राम खोत, पोलीस अंमलदार लक्ष्मण जायभाये, जितेंद्र ओव्हळ, रामेश्वर काकडे, गोरख डोके यांनी केली.

### नवीन वर्षाची

सेवा सादर करणार आहेत. या महोत्सवाची सुरुवात ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार असून, बीड शहर व परिसरातील सर्व भाविक भक्तांनी सहकुटुंब, सहपरिवार व मित्रपरिवारासह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. हा संपूर्ण कीर्तन महोत्सव बीड व अहिल्यानगर जिल्हे मोतीबिंदू मुक्त करण्याचा संकल्प करणारे सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. अशोक महाडिक यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. डॉ. महाडिक यांनी आनंदऋषीजी नेत्रालयाच्या माध्यमातून अवघ्या ८ वर्षांत १ लाख १९ हजार नेत्रशस्त्रक्रिया करून असंख्य आजीआजोबांचे जीवन प्रकाशमान व सुखकर केले आहे. अशा कर्तृत्ववान समाजसेवक डॉक्टरांच्या सन्मानार्थ हा कीर्तन महोत्सव समस्त बीडकरांच्या वतीने त्यांना समर्पित करण्यात येत आहे.

### सोयाबीन खरेदी केंद्रावर

सहा ते सात दिवसापासून बारदाना उपलब्ध नसल्याने सोयाबीन खरेदी करण्याचे काम पूर्णतः ठप्प झालेले आहे परिणामी हजारो शेतकऱ्यांना आपली सोयाबीन विक्री करता येत नसून त्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे शेतकऱ्याचा हा प्रश्न शासनाने तात्काळ मार्गी लावा वा म्हणजे जिल्ह्यातील सर्व सोयाबीन खरेदी केंद्र सुरू होतील सोयाबीन खरेदी केंद्रावर तात्काळ बारदाना उपलब्ध न करून दिल्यास ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन उभारण्यात येईल असा इशारा प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी दिला आहे.

### कला महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधून

जास्त वर्षे त्यांचे राजकीय व सामाजिक कार्य आहे. दिवसेंदिवस मुलींची संख्या वाढत आहे. मी अगदी सामान्य घरातून आले आहे. अगोदर आई वडीलांचा विश्वास संपादन केला त्यामुळे मी जिवनात यशस्वी झाले. विद्यार्थ्यांनो शिक्षण अगोदर पुर्ण करा. अभिनयाची आवड असेल तर आत्मविश्वास हवा. आपल्या हुशारीचा वापर योग्य ठिकाणी करा. कला क्षेत्रात भरपूर वाव आहे. माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमात सौ. दमयंतीताई धोंडे यांचे मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सामाजिक, राजकीय,शैक्षणिक क्षेत्रासह चित्रपट क्षेत्रात काम केले ही बाब चांगली आहे. आष्टी हा ग्रामीण भाग आहे परंतु मला शहरात आल्यासारखे वाटले एवढा विकास केल्याचे दिसत आहे.यावेळी अभिनेत्री हेमांगी कवी यांना यावर्षीचा कला क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी हेमांगी कवी यांनी फु बाई फु मधील अनेक विनोदी संवाद सांगुन उपस्थितांचे मनोरंजन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी सांगितले की, आता हा फक्त महोत्सव राहिला नाही तर राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सव बनला आहे.गंगाई बाबाजी महोत्सवाचे रुपांतर वटवृक्षात झाले आहे. संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आपल्या आईवडीलांच्या स्मृती प्रित्यर्थ हा महोत्सव सुरू केला. चांगला समाज घडविण्याच्या उद्देशाने हा महोत्सव सुरू केला.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सुत्रसंचलन प्रा. डॉ. आप्पासाहेब टाळके यांनी केले. उपस्थितांचे आभार सुरेश फुले यांनी मानले.प्रा. डॉ. अनिल हजारे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कार्यक्रमास विद्यार्थी विद्यार्थीनी पालक व आष्टी परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'न्यूट्री जॅग' गुळ उद्योगच्या पाचव्या ऊस गळीत हंगामासाठी २७०० रुपये भाव जाहीर!

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील लुखेगाव येथील शुक्रवार दिनांक २६ डिसेंबर शुक्रवार रोजी लुखेगाव येथील गट/सर्वे नंबर १ मध्ये न्यूट्रि जॅग गुळ उद्योग पाचवा गळित हंगाम शुभारंभ वेळी लुखेगांव चे सरपंच ॲड.नासेरखान पठाण उपसरपंच दत्ता कसबे,पत्रकार



ग्रामपंचायत सदस्य ,गांवकरी ,यांच्या उपस्थितीत संपन्न झाला कार्यक्रम चे अध्यक्ष पत्रकार सुरक्षा समिती बीड जिल्हाध्यक्ष वाजेद पठाण हे होते तर व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती ॲड.नासेरखान पठाण सरपंच लुखेगाव ,उपसरपंच दत्ता कसबे ,माजी सरपंच खय्युम पठाण,खंडू कांबळे ,पत्रकार फेरोज पठाण तसेच न्यूट्री जॅग गूळ उद्योग चे संस्थापक अध्यक्ष अंबादास रोकड़े सर उपस्थित होते प्रस्ताविक अंबादास रोकडे सर यांनी केले ते म्हणाले की हा उद्योग २६ जानेवारी २०२२ पासुन सुरु केला पाचवा गळित हंगाम ला सुरवात होत आहे शेतकार्यांची ऊसाची अडचण व त्यांचे हित लक्षात घेवून दुर्गम भागात उद्योग सुरू केला आहे नेहमीच शेतकार्यांना चांगला भाव देण्यात आला आहे

यावर्षीच्या गळीत हंगामासाठी शेतकऱ्यांना प्रति टन रुपये २७००/ भाव जाहिर करण्यात आला आहे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे या प्रायव्हेट लिमिटेड न्यूट्री जॅग गूळ उद्योग कारखान्यात केमिकल फ्री स्वच्छ व नैसर्गिक प्रकार चे गुळाचे उत्पादन ५ ग्राम १० ग्राम ५०० ग्राम १ किलो १० किलो या प्रमाणात घेतले जाते ग्राहकांना उत्तम प्रकार चे खाण्या योग्य गुळ निर्मिती करून मार्केट ला पुरवठा केला जातो अध्यक्षीय समारोप प्रसंगी पत्रकार सुरक्षा समिती बीड जिल्हाध्यक्ष वाजेद पठाण यानी यावेळी गुळ उद्योगचे शेतकऱ्यांनी हित लक्षात घेऊन ऊस पुरवठा करावा सर्वांनी सहकार्य करावे व अडीअडचणीला मदत करावी असे अवाहन केले आहे याप्रसंगी गुळ उद्योग चे व्यवस्थापक अजित अंबादास रोकडे , मित्र असिफोद्दिन इनामदार,माजेद पटेल, ग्रामपंचायत सदस्य अखिल खान,शाहेद पठाण, सर्व गांवकरी मुकदम उपस्थित होते सूत्रसंचालन पत्रकार फेरोज पठाण यांनी केले तर आभार अजित रोकडे यांनी मानले.

## गोपाळपूर येथे सायबर सुरक्षा जागरूकता कार्यक्रम संपन्न

किल्ले धारूर । प्रतिनिधी

डिजिटल इंडिया व्हिसा सीएससी अकॅडमी अंतर्गत सीएससी गव्हर्नन्स सर्व्हीस इंडिया लिमिटेड च्या वतीने तालुक्यातील गोपाळपूर येथे सायबर सुरक्षा जागृता कार्यक्रमावर आधारित एकदिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली यावेळी याविषयी सविस्तर मार्गदर्शन उपस्थितांना करण्यात आले




या कार्यशाळेचे उद्घाटन गोपाळपूर चे सरपंच राजेश सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी , आशा वर्कर संगीता रंगनाथ कांबळे, सीएससी सेंटर आराध्या मल्टी सर्विसेस अश्विन गुळवे ते उपस्थित होते या प्रशिक्षण व कार्यशाळेत गोपाळपूर युवक युवती महिला पुरुष सहभागी मोठ्या संख्येने झाले होते पहिल्या सत्रामध्ये महिला व पुरुष यांना आर्थिक समावेशन व सायबर सिक्युरिटी याविषयी जनजागृती संबंधी माहिती देण्यात आली तर दुसऱ्या सत्रात १६ ते २६ वर्षीय युवतींना सायबर शक्ती निवड करून प्रमाणपत्र देण्यात आले तर तिसऱ्या अंतिम सत्रात गावातील व्यवसायिकासाठी यामध्ये आर्थिक देवाणघेवाण डिजिटल देवाणघेवाण तसेच या संबंधी अधिक सविस्तर माहिती देण्यात आली या कार्यक्रमास गावातील नागरिक महिला युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## कोल्हापूरचं सांस्कृतिक वैभव संपूर्ण महाराष्ट्राला लाभलं पाहिजे - डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कोल्हापूरच्या मातीतून अनेक कलाकारांनी जन्म घेतला आणि महाराष्ट्राचं नांव सात समुद्रापार जगामध्ये नेलं असं हे सांस्कृतिक वैभव लाभलेलं कोल्हापूर या ठिकाणी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होत असतात आणि इथले कलाकार त्यात हिरीरीने सहभाग नोंदवत असतात. एकेकाळी कोल्हापूर हे मराठी चित्रपटसृष्टीचे वैभव होतं. या ठिकाणी अनेक ख्यातनाम दिग्दर्शक, निर्माते, संगीतकार, गायक, कलाकार निर्माण झाले. त्यांनी चित्रपट सृष्टीला एक नवा आयाम दिला. असे हे कोल्हापूरचं सांस्कृतिक सांघिक वैभव संपूर्ण महाराष्ट्राला लाभलं पाहिजे असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.राजेश इंगोले यांनी कोल्हापूर येथे केले. ते गानकोकिळा स्वर्गीय लतादीदी मंगेशकर यांच्या ९५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सांगितिक श्रद्धांजली या कार्यक्रमात व्यक्त केले. या कार्यक्रमाची नोंद वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन कोल्हापूरच्या कोल्हापूर मेडिकल असोसिएशनच्या सरगम म्युझिकल ग्रुपच्या डॉ.आशा शितोळे, डॉ.सुभाष भाट व डॉ.परितेकर मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली कोल्हापूर चित्रपट मंडळ यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तसेच आयएमएचे सांस्कृतिक समितीचे राज्य अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले तर अध्यक्षस्थानी डॉ.आशा शितोळे मॅडम ह्या होत्या. कार्यक्रमाची




सुरूवात स्व.लता मंगेशकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व पसायदानाने झाली. यावेळी कोल्हापूरच्या संस्कृती वैशिष्ट्यानुसार कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते एका वृक्षाला पाणी देऊन करण्यात आले. आपल्या उद्घाटकीय भाषणात बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी कोल्हापूर येथे आज ही विविध क्षेत्रातील मंडळी एकत्र येतात आणि कोल्हापूरची संस्कृती अशा सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे जोपासण्याचे काम करतात ही गोष्ट कौतुकास्पद आहे याचे अनुकरण संपूर्ण महाराष्ट्राने केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. कोल्हापूर हे एकेकाळी मराठी चित्रपट सृष्टीचा केंद्रस्थान होते कोल्हापूरला हे गत वैभव प्राप्त करून देण्यासाठी येथील राजकीय नेत्यांनी प्रयत्न केले पाहिजेत. एखाद्या आवडत्या कलाकाराला त्याच्या मृत्यूनंतर ही जिवंत ठेवण्याचे काम त्याचे अनुयायी त्याच्या कलेला जोपासून करू शकतात. हे या कार्यक्रमाद्वारे या आयोजित मंडळींनी दाखवून दिले आहे त्यांच्या या कार्याला मी अभिवादन करतो आणि त्यांनी त्यांची सांस्कृतिक चळवळ अशीच जोमाने पुढे न्यावी या शुभेच्छा देतो. कला ही कलाकाराला मरणोपरांतही जिवंत ठेवत असते आणि ज्याच्या अंगी एखादी कला आहे असा व्यक्ती जीवनाचे ताण-तणाव विसरून कुठल्याही मोठ्या संकटाशी संघर्ष करायला तयार असतो. कारण, त्याच्या अंगातली कला ही त्याच्या ऊर्जेचे स्त्रोत असतं. त्यामुळे कलाकार हे नेहमी प्रसन्न चित्त असतात आणि ताणतणाव मुक्त असतात त्यामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपले ताण तणाव विसरण्यासाठी अशी एखादी कला शिकून त्याला जोपासण्याचे काम करावे असे मत डॉ.इंगोले यांनी मत व्यक्त केले. आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलत असताना डॉ.आशा शितोळे यांनी गेल्या साडेतीन महिन्यांपासून कोल्हापूर मेडिकल असोसिएशन, कोल्हापूर चित्रपट मंडळाचे सदस्य व सरगम म्युझिकल ग्रुपचे सदस्य हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत आज या कार्यक्रमात महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातून तब्बल १०४ गायक कलावंतांनी सहभाग नोंदवून स्वर्गीय लताजी मंगेशकर यांना आपली सांगितिक श्रद्धांजली अर्पण केली आणि हा एक विश्वविक्रम ठरला या गोष्टीचे आम्हाला खूप समाधान आहे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ.आशा शितोळे,डॉ.अनिता परितेकर, डॉ.अनिल कवठेकर राजकुमार पारकर, बिनॉय किनीकर, पुष्पक गवई, केटी शिंदे, माया पाडळेकर, सुषमा पाटील, राहुल मेहता, किनीकर यांच्यासह अनेक जणांनी पुढाकार घेतला.

# ऊस गाळप वेगाने! राज्यात ४४७.८२ लाख क्विंटल साखर उत्पादन

## कोल्हापूरचा उतारा सर्वाधिक १०.२३ टक्के



पुणे : राज्यातील २०२५-२६ हंगामातील ऊस गाळपाने वेग घेतला आहे. यंदा १९३ साखर कारखान्यांचा हंगाम सुरु असून, त्यांनी २८ डिसेंबर २०२५ पर्यंत ५१५.३ लाख मेट्रिक टन ऊस गाळप केले आहे. त्यातून त्यांनी ४४७.८२ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. राज्यातील सरासरी साखर उतारा ८.६९ टक्के एवढा आहे. कोल्हापूर विभागाचा साखर उतारा सर्वाधिक १०.२३ टक्के आहे. तर सर्वात कमी उतारा नागपूर विभागाचा ६.८८ टक्के एवढा आहे.

साखर आयुक्तालयाच्या आकडेवारीनुसार, एकूण ऊस गाळपात पुणे विभाग आघाडीवर आहे. पुणे विभागातील एकूण ३० कारखान्यांचा हंगाम सुरु असून, त्यांनी २८ डिसेंबरपर्यंत सर्वाधिक १२४.८ लाख मेट्रिक टन ऊस गाळप केले आहे. यातून त्यांनी १११.४१ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. पुणे विभागाचा साखर उतारा ८.९३ टक्के एवढा आहे. सोलापूर विभागातील १५ सहकारी आणि २८ खासगी मिळून एकूण ४३ कारखान्यांचा हंगाम सुरु आहे. त्यांनी आतापर्यंत १०७.४ लाख मेट्रिक टन ऊस गाळप करत, ८३.९१ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतल आहे. सोलापूर विभागाचा साखर उतारा ७.८१ टक्के आहे. अहिल्यानगर विभागातील २६ कारखान्यांनी आतापर्यंत ६१.९२ लाख मेट्रिक टन ऊस गाळप केले आहे. त्यांनी ५०.५८ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. त्यांचा साखर उतारा ८.१७ टक्के आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील २२ कारखान्यांनी ४९ लाख मेट्रिक टन ऊस गाळप करत, ३५.९३ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे. तर साखर उतारा ७.३३ टक्के एवढा आहे. नांदेड विभागातील २९ कारखान्यांनी ५२.११ लाख मेट्रिक टन ऊस गाळपातून, ४४.२१ लाख क्विंटल साखर उत्पादन घेतले आहे.

# आडसाली उसाचे पाचट काढण्याचे फायदे



ऊस लागवड केल्यानंतर उसाचे पाचट काढावे की न काढावे या द्विधा मनस्थितीत शेतकरी असतो. आपण बघितले तर प्रत्येक उसाच्या पेऱ्याजवळ उसाचे पान असते. सुरुवातीची आणि शेवटची पाने अरुंद व निमुळती दिसतात. मध्यंतरीची पाने १ ते २ इंच रुंद असतात. ही पाने जवळपास १ मीटर लांबीची असतात. पूर्ण वाढ झालेल्या उसाला हिरवी १० पाने असतात.

असे होतात फायदे : उसातील वाळलेले पाचट काढल्यामुळे पिकामध्ये हवा खेळती राहते. सूर्यप्रकाश मुळापर्यंत जातो त्यामुळे वाटरशुट म्हणजेच कोंब वाढण्यास मदत होते तसेच उसाची जाडी वाढते. सरीमधून जाणे-येणे सोपे होते त्यामुळे उसाला खते घालणे, ड्रेंचिंग करणे ही कामे करणे सहजरीत्या करता येतात. उसामध्ये फिरता येत असल्यामुळे उसातील कीड व रोग लक्षात येतात, त्यामुळे उपाययोजना करणे सोपे होते. १ एकर क्षेत्रातून सरासरी २ ते ३ टन पाचट मिळते. १ टन पाचटापासून सरासरी २० कि.ग्रॅ. नत्र, १० कि.ग्रॅ. स्फुरद व १० ते २० कि.ग्रॅ. पालाश इतके खत मिळते. पाचटामुळे जमिनीवर आच्छादन झाल्यामुळे तण नियंत्रणासाठी फायदा होतो. तसेच पाचटाखाली जिवाणूंची चांगली वाढ होते.

पाचट काढताना घ्यायची काळजी : आडसाली उसाचे पाचट डिसेंबर महिन्यापूर्वी म्हणजेच ऊस पाच ते सहा महिन्याचा झाल्यानंतर मोठ्या भरणीनंतर काढावे. आडसाली उसाचे पाचट डिसेंबरनंतर काढू नये कारण फेब्रुवारीपासून उन्हाळा सुरु झाल्यामुळे उन्हाच्या झळा आतमध्ये शिरतात त्यामुळे उसातील पाण्याचे बाष्पीभवन होते. त्यामुळे ऊस सुकल्यासारखा दिसतो. ऊस पाचट काढताना हिरवी पाने काढू नयेत, कारण ऊस पिकाला लागणारे अन्न या पानामध्ये तयार होते. त्यामुळे हिरव्या पानाचे क्षेत्रफळ जेवढे कमी होईल तेवढे उसाची अन्न तयार करण्याची प्रक्रिया कमी होते. त्यामुळे उसाची जाडी वाढत नाही. बियाणासाठी ठेवलेल्या उसाचे पाचट काढू नये. फुले २६५, १०००१, ८००५ या वाणाच्या उसाचा पाला किंवा पाचट काढू नये. फुले २६५ या उसाचे पाचट काढल्याने डोळे फुटतात. ८६०३२ या वाणाच्या आडसाली उसाचे पाचट काढणे फायदेशीर ठरते. काढलेले उसाचे पाचट हे सरीमध्ये चांगल्या पद्धतीने कुजले तर त्याचे खत चांगले होते. उभ्या उसातील सरीमध्ये एकरी १०० कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट व ५० कि.ग्रॅ. युरिया पाचटावर टाकल्याने पाचट लवकर कुजते. तसेच पाचट कुजवण्यासाठी पाणी दिल्यानंतर प्रतिएकरी १ लिटर द्रवरूप डिकंपोझिंग कल्चरची फवारणी करावी. उसाचे पाचट शक्यतो एकदाच काढावे.

# हरभऱ्यावर घाटेअळीचा हल्ला; कळीफुलोऱ्यातील पिके धोक्यात

यंदाच्या रब्बी हंगामात हरभऱ्याच्या लागवड क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली असली, तरी सध्या पिकावर घाटेअळीच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण आहे. बहुतांश भागांत हरभरा पीक कळी व फुलोरा अवस्थेत असताना घाटेअळीने पिकावर हल्ला चढवला असून कळ्या व फुले गळून पडत असल्याचे चित्र दिसून येत आहे. याचा थेट परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अनेक ठिकाणी पीक जोमात वाढले आहे. मात्र, अनुकूल हवामान परिस्थितीचा फायदा घेत घाटेअळीने झपाट्याने वाढ केल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची भीती आहे. घाटेअळी ही हरभऱ्यासाठी अत्यंत घातक कीड मानली जाते. ही कीड कळी, फुले आणि शेंगा कुरतडून मोठ्या प्रमाणात नुकसान करते. घाटेअळीच्या नियंत्रणासाठी शेतकरी विविध प्रकारच्या कीटकनाशकांची फवारणी करत आहेत. अनेक ठिकाणी दोन ते तीन वेळा फवारणी करावी लागत असल्याने उत्पादन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. योग्य कीटकनाशकांची निवड न झाल्यास फवारणी निष्फळ ठरण्याची शक्यता असून, यामुळे खर्च वाढूनही अपेक्षित परिणाम मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे कृषी विभागाकडून शिफारस केलेल्या औषधांचा योग्य प्रमाणात वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हवामानामुळे किडीचा फैलाव :

दिवसाचे वाढलेले तापमान, रात्रीचा गारवा आणि काही भागांत ढगाळ हवामान यामुळे घाटेअळीच्या वाढीस पोषक वातावरण तयार झाले आहे. अशा परिस्थितीत कीड जलद गतीने फैलावत असून, कळीफुलोरा अवस्थेतील पिकांना मोठा धोका निर्माण झाला आहे. कृषी तज्ज्ञांच्या मते, या टप्प्यावर नियंत्रण न केल्यास उत्पादनात मोठी घट होऊ शकते.वेळीच उपाययोजना गरजेच्या : कृषी विभागाने शेतकऱ्यांना दररोज पिकांची पाहणी करण्याचा सल्ला दिला आहे. घाटेअळी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे, फेरोमोन ट्रॅप यांचा वापर करणे, तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जैविक व रासायनिक उपाय संतुलित पद्धतीने राबविल्यास किडीचा प्रादुर्भाव आटोक्यात आणता येऊ शकतो.

मका पीकही किडींच्या विळख्यात : हरभऱ्याबरोबरच जिल्ह्यातील मका पिकावरही विविध किडींचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. खोडकिड, लष्करी अळी तसेच पाने कुरतडणाऱ्या अळ्यांमुळे मक्याचे नुकसान होत असून, विशेषतः कोवळ्या अवस्थेतील पिकांवर याचा अधिक परिणाम जाणवत आहे. उगवणीनंतर पिकांची वाढ खुंटत असल्याचे चित्र अनेक शेतांमध्ये दिसून येत आहे. रब्बी हंगामातील पिकांवर किडींचे संकट वाढत असताना, वेळेत योग्य उपाययोजना केल्यास संभाव्य नुकसान टाळता येईल, असा विश्वास कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.






### महत्वाच्या घटना

१८०३ : ला ब्रिटन च्या इस्ट इंडिया कंपनी ने दिल्ली,आग्रा आणि भरूच वर आपले नियंत्रण सुरु केले.
१९०६ : ऑल इंडिया मुस्लिम लीगची ढाक्का येथे स्थापना. या घटनेतच भारताच्या फाळणीची बीजे रोवली गेली.
१९२४ : एडविन हबलने आकाशगंगेखेरीज इतर दीर्घिकाही अस्तित्त्वात असल्याचे जाहीर केले.
१९४३ : सुभाषचंद्र बोस यांनी पोर्ट ब्लेअर येथे भारतीय स्वातंत्र्याचा झेंडा फडकविला
१९७९ : ला पश्चिम आफ्रिकेतील एका देशाने संविधानाचा स्विकार केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

३९ : टायटस - रोमन सम्राट (मृत्यू: १३ सप्टेंबर ८१)
१८६५ : रुडयार्ड किपलिंग - नोबेल पारितोषिकविजेते ब्रिटिश लेखक (मृत्यू: १८ जानेवारी १९३६)
१८७९ : वेंकटरमण अय्यर तथा योगी रमण महर्षी - भारतीय तत्त्ववेत्ते (मृत्यू: १४ एप्रिल १९५०)
१८८७ : डॉ. कन्हैय्यालाल मुन्शी - मुंबईचे पहिले गृहमंत्री, हैदराबाद संस्थानात भारत सरकारचे एंजट जनरल, नामवंत साहित्यिक आणि 'भारतीय विद्याभवन'चे संस्थापक (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९७१)
१९०२ : डॉ. रघू वीरा - भाषाशास्त्रज्ञ, जनसंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष, घटनासमितीचे सदस्य, राज्यसभा खासदार, वैदिक संस्कृत, तिबेटी, चिनी, मंगोलियन इत्यादी भाषांचे जाणकार (मृत्यू: १४ मे १९६३)
१९२३ : भारतीय शैक्षणिक व राजकारणी प्रकाश केर शास्त्री यांचा जन्म. (मृत्यू: २३ नोव्हेंबर १९७७)
१९३४ : हबल स्पेस टेलिस्कोप चे सहनिर्माते जॉन एन. बाहॅकल यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑगस्ट २००५)
१९३५ : प्रथम भारतीय चेस मास्टर मॅन्युअल आरोन यांचा जन्म.
१९५० : सी + + प्रोग्रामिंग भाषाचे जनक बर्जनी स्ट्रास्ट्रुप यांचा जन्म.
१९५० : भारतीय समज सेवक डॉ. हनुमाप्पा सुदर्शन यांचा जन्म.
१९८३ : इन्स्टाग्रामचे सहसंस्थापक केविन सिस्ट्रम यांचा जन्म.
१९८९ : भारतीय क्रिकेटपटू सौरभ तिवारी चा जन्म.
१९९२ : भारताच्या युवा बॅडमिंटन खेळाडू सौरभ वर्मा यांचा जन्म.
१९९४ : भारताच्या आर्चर आणि अर्जुन पुरस्कार विजेता रजत चौहान चा जन्म

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६९१ : रॉबर्ट बॉईल - आयरिश रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २५ जानेवारी १६२७)
१९४४ : रोमें रोलाँ - साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१५) विजेते फ्रेन्च लेखक, नाटककार व संगीत समीक्षक (जन्म: २९ जानेवारी १८६६)
१९७१ : डॉ. विक्रम साराभाई - भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १२ ऑगस्ट १९१९)
१९७४ : आचार्य शंकरराव देव - गांधीवादी कार्यकर्ते.
१९८२ : दत्ता उर्फ दादा धर्माधिकारी - चित्रपट अभिनेते व दिग्दर्शक (सतीची पुण्याई, धाकटी मेहुणी, भक्त पुंडलिक, नसती उठाठेव, मुझे सीने से लगा लो, सतीचे वाण, थांब लक्ष्मी कुंकू लावते, वैशाख वणवा, सुभद्रा हरण, क्षण आला भाग्याचा, सप्तपदी इ. अनेक चित्रपट) (जन्म: २ डिसेंबर १९१३ कोल्हापूर)
१९८७ : दत्ता नाईक ऊर्फ 'एन. दत्ता' - संगीतकार.
१९९० : भारतीय लेखक, कवी आणि समीक्षक रघुवीर सहाय यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १९२९)
२००६ : इराकी हुकूमशहा व इराकचे ५ वे अध्यक्ष सद्दाम हुसेन यांना फाशी (जन्म: २८ एप्रिल १९३७)
२०१५ : भारतीय कवी, नाटककार, आणि अनुवादक मंगेश पाडगावकर यांचे निधन. (जन्म: १० मार्च १९२९).

# पोल्ट्री उद्योगामधून तयार होतेय नवीन ओळख



पुणे शहरातील ग्राहकांची गरज ओळखून चिकनसोबत अंड्याची वाढती मागणी लक्षात घेऊन लोणी काळभोर (ता. हवेली, जि. पुणे) येथील किरण काळभोर यांनी लेअर पोल्ट्री उद्योगात चांगला जम बसविला आहे. सुरुवातीला कोळभोर कुटुंबीयांनी एक एकर शेती खरेदी केली होती. शेतीतून अपेक्षित आर्थिक उत्पन्न मिळत नसल्याने पूरक उद्योगातून आर्थिक उत्पन्न वाढविण्याचा त्यांनी निर्णय घेतला.यातूनच कुक्कुटपालन व्यवसायाला सुरुवात केली. किरण काळभोर यांनी २०१४ मध्ये लेअर पोल्ट्री व्यवसायाची निवड केल्यानंतर तांत्रिक माहिती घेण्यासाठी अनेक ठिकाणी भेटी दिल्या. या भेटीतून त्यांनी नवीन तंत्रज्ञानाची माहिती घेतली. या व्यवसायातील बारकावे समजून घेत ब्रॉयलर आणि लेयर अशा दोन्ही प्रकारच्या पोल्ट्री व्यवसायाचे व्यवस्थापन आणि आर्थिक उलाढालीचा अभ्यास केला.

शेडसाठी लागणारी जागा, व्यवस्थापन खर्च, खेळते भांडवल, विक्रीचे नियोजन यातील बारकावे समजून शहरातील दुकानदारांच्याकडून अंड्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन लेअर पोल्ट्री सुरू करण्याचा निर्णय घेतला. व्यवसाय सुरू करताना आर्थिक अडचणी आल्या होत्या. त्यावर मात केली. तसेच खर्च अधिक असल्याने बँकेकडून कर्ज घेऊन लेअर पोल्ट्री व्यवसायाला गती दिली.

शेडची उभारणी

किरण काळभोर यांनी २०१४ मध्ये पहिल्या टप्यात ६२ फूट बाय ४०० फूट आकाराची पोल्ट्री शेड तयार केली. शेडची उभारणी पूर्ण झाल्यानंतर शास्त्रीय पद्धतीने लेअर कोंबड्यांच्या व्यवस्थापनासाठी योग्य आकाराचे पिंजरे बसविले. या शेडमध्ये सुमारे ३० हजार लेअर कोंबड्यांचे चांगल्या पद्धतीने व्यवस्थापन सुरू केले. पोल्ट्री उद्योगात चांगला जम बसल्यानंतर दोन वर्षांनी ६२ बाय ४०० फूट आकारमानाच्या दुसऱ्या लेअर फार्म शेडची उभारणी केली. सध्या दोन्ही शेड मिळून ६० हजार लेअर कोंबड्यांचे संगोपन केले जाते. कोंबडी पिले खरेदी केल्यानंतर पहिले १२ आठवडे स्वतंत्रपणे एका शेडमध्ये ठेवली जातात. त्यासाठी ४५ बाय ७०० फुटांचे शेड उभारण्यात आले आहे. या शेडमध्ये व्यवस्थितरीत्या संगोपन, खाद्य व्यवस्थापन आणि लसीकरण केल्यानंतर मुख्य शेडमध्ये कोंबड्यांना नेले जाते. १८ आठवड्यांपासून कोंबडी अंडी देण्यास सुरुवात करते. सुरुवातीच्या काळात अंडी लहान असल्याने दरही कमी असतो. परंतु २५ व्या आठवड्यापासून अंड्याचा आकार चांगला मिळण्यास सुरुवात होते. त्यामुळे दरही चांगला मिळतो. साधारणपणे एक कोंबडी ८५ ते ९० व्या आठवड्यांपर्यंत अंडी देत राहते.

खाद्याचा पुरवठा : सुरुवातीचे दोन महिने कंपनीचे कोंबडी खाद्य वापरण्यात आले. परंतु ओळखीचे पोल्ट्रीचालक आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार किरण काळभोर यांनी स्वतः कोंबडी खाद्य बनवण्याचा निर्णय घेतला. दहा लाख रुपये किमतीची यंत्रणा विकत घेतली. त्यानंतर फीडसाठी लागणारे घटक विकत घेऊन स्वतः खाद्य निर्मितीला सुरुवात केली. यामुळे प्रति किलोमागे एक ते तीन रुपयांपर्यंत बचत होऊ लागली. सुरुवातीला कोंबड्यांना मजुरांकरवी खाद्य देत असल्यामुळे साधारणपणे दोन ते तीन तास वेळ जायचा आणि फार कष्ट जाणवत होते. तसेच मजूरटंचाईचा सामना करावा लागला. त्यामुळे कोंबड्यांना खाद्य देण्यासाठी आधुनिक यंत्रणा पोल्ट्री शेडमध्ये बसविण्यात आली. त्यामुळे कोंबड्यांना आठ ते दहा मिनिटांमध्ये खाद्य देण्याचे काम पूर्ण होऊन वेळेची बचत होऊन त्रासही कमी झाला.

पाण्याची योग्य सोय

पोल्ट्रीला पाणीपुरवठा होण्यासाठी विहिरीची व्यवस्था आहे. या पाण्याची सातत्याने प्रयोगशाळेत तपासणी केली जाते. त्यानुसार पाण्याची गुणवत्ता चांगली ठेवली जाते. कोंबड्यांना योग्य गुणवत्तेचे पाणी मिळेल यापद्धतीने नियोजन केले जाते. त्यासाठी शेडमध्ये तीन टाक्या बसविण्यात आल्या आहेत. टाक्यांद्वारे स्वयंचलित निपल सिस्टिम पद्धतीने कोंबड्यांना पाणी पिण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अंड्यांचे उत्पादन आणि विक्रीचे नियोजन

सुरुवातीच्या काळात अंड्यांचे उत्पादन कमी होते. परंतु हळूहळू त्यात वाढ झाली. सध्या दोन्ही शेड मिळून दररोज ५५ हजार अंडी उत्पादन होत आहे. त्यात काही वेळा खराब अंडी होण्याचे प्रमाण असले, तरी ते अत्यंत नगण्य आहे. सुरुवातीला अंडी विक्रेत्यांबरोबरीने करार करण्यात आला. सध्या पाच विक्रेत्यांच्या माध्यमातून अंड्यांची विक्री केली जाते. ही सर्व विक्री फार्मवर केली जाते. त्यामुळे वाहतूक खर्च, वेळेची बचत होत आहे. याशिवाय पुण्यातील मॉलमध्ये आकर्षक पॅकिंगमध्ये अंड्यांची विक्री केली जाते. यासाठी 'श्रीमंत अंबरनाथ पोल्ट्री' या नावाचा ब्रँड तयार केला आहे.अंड्यांचे दररोज दर बदलत असतात. त्यामुळे ग्राहकांच्या मागणीनुसार कमीअधिक दराने विक्री करावी लागते. साधारणपणे वर्षभराच्या सरासरीनुसार प्रति नग ३ ते ६ रुपयांपर्यत दर मिळतो. बाजारपेठेतील पुरवठ्यानुसार दररोज दर बदलत असतात. पोल्ट्री व्यवसायात कोंबड्यांचे व्यवस्थापन, वाहतूक, खाद्य, मजूर, वीजबिल असा मोठा खर्च होतो. हा सर्व खर्च वजा जाता महिन्याला सरासरी तीन लाखांचा नफा होता. हा नफा बाजारपेठेतील दरावर अवलंबून असतो. काही वेळा अपेक्षेपेक्षा कमी दरानी अंडी विकली जातात. परंतु पोल्ट्रीचे काटेकोर व्यवस्थापन ठेवून खर्च मर्यादित ठेवण्यावर काळभोर यांनी भर दिला आहे. त्यामुळे बँक कर्ज परतफेड व्यवस्थित करता येते.

कोंबड खताची विक्री : पोल्ट्रीमधून कोंबडी खत चांगल्या प्रतीचे मिळत असल्यामुळे शेतकऱ्यांच्याकडून यास वाढती मागणी आहे. परिसरातील अनेक शेतकरी दरवर्षी मोठ्या प्रमाणात कोंबडी खताची खरेदी करतात. पूर्ण वर्षभराच्या कालावधीत साधारणपणे आठ लाख रुपयांची खत विक्रीतून उलाढाल होते.

cmyk



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ | ५



# जामखेड परिसरात अवैध दारू विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई

## १ लाख ६८ हजार ९६० रुपयांचा देशी दारू साठा जप्त; एकास अटक



जामखेड । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यात अवैध दारू व्यवसाय व इतर बेकायदेशीर धंद्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांनी दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने जामखेड तालुक्यात मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत जामखेडनान्नज रस्त्यावरील चुंबळी शिवारात अवैध देशी दारूची विक्री करणाऱ्या एका इसमास ताब्यात घेऊन तब्बल १,६८,९६० रुपये किमतीचा देशी दारू साठा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कबाडी यांनी विशेष पथक गठीत केले होते. दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी पोउपनि. समीर अभंग, पोलीस अंमलदार हृदय, घोडके, शामसुंदर जाधव तसेच चालक अरुण मोरे यांचे पथक जामखेड पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्याबाबत माहिती काढत असताना गस्त घालत होते. दरम्यान, जामखेड ते नान्नज जाणाऱ्या रस्त्यावर चुंबळी गावाच्या शिवारातील न्यू रशिका हॉटेल येथे तुषार जगताप हा देशी दारूची अवैध विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पथकास मिळाली. त्यानुसार सदर ठिकाणी तात्काळ छापा टाकण्यात आला. छाप्यावेळी एक इसम आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव तुषार विठ्ठल जगताप (वय ३२ वर्षे, रा. शिवाजीनगर, जामखेड, ता. जामखेड) असे सांगितले. पंचासमक्ष झडती घेतली असता सदर ठिकाणी ४४ सिलबंद बॉक्स देशी दारू आढळून आले. प्रत्येक बॉक्समध्ये ४८ सिलबंद बाटल्या असून एकूण दारू साठ्याची किंमत १,६८,९६० रुपये असल्याचे स्पष्ट झाले. सदर सर्व मुद्देमाल जप्त करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी पोलीस अंमलदार श्यामसुंदर अंकुश जाधव (पोना/१५६६) यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ६८३/२०२५ महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई सुरू असून अधिक तपास जामखेड पोलीस स्टेशनकडून केला जात आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली असून पथकातील सर्व अधिकारी व अंमलदारांचे कार्य कौतुकास्पद असल्याची प्रतिक्रिया वरिष्ठ स्तरावरून व्यक्त करण्यात आली आहे.

# महानगरपालिका निवडणूक आजपर्यंत ४८ अर्ज दाखल

## भाजप राष्ट्रवादी शिवसेना युती झाल्यास बंडखोरी,अपक्ष उमेदवार वाढणार

जालना । प्रतिनिधी

जालना महापालिका निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी अजित पवार गट, या पक्षाची युती होण्यासाठी तारीख पे तारीख असा प्रकार सुरू आहे यामुळे कोणाला तिकीट मिळणार कोणाला नाही मिळणार हे चित्र लवकरच स्पष्ट होणार आहे. उमेदवारी अर्ज खरेदी आणि दाखल करण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून उमेदवारी दाखल करण्यासाठी आता फक्त सोमवार मंगळवार दोन दिवस उरले आहे यावेळी वेळ कमी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच भाजप, शिंदे गट शिवसेना, अजित पवार गट राष्ट्रवादी, या तिन्ही पक्षाने युती केल्यास बंडखोरी व अपक्ष उमेदवार अर्ज जास्त दाखल होऊ शकतात गेल्या ४ दिवसात विक्री झालेल्या अर्जाची एकुण संख्या २ हजार ४८७ वर पोहोचली असून, प्रत्यक्ष अर्ज दाखल करण्यासाठी झुंबड उडाली आहे.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार (ता. २७) १ ते १६ प्रभागासाठी ३९२ अर्जाची विक्री झाली. दि. २३ डिसेंबरपासून सुरु झालेल्या या प्रक्रियेत आतापर्यंत २ हजार ४८७ संच इच्छुकांनी खरेदी केले आहेत. प्रभागनिहाय राजकीय चुरस वाढत असल्याने इच्छुकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. आज ३४ अर्ज प्राप्त सुरुवातीचे काही दिवस केवळ अर्जाची विक्री होत असताना आता प्रत्यक्ष अर्ज भरण्याकडे प्रभागातून एकुण ३४ नामनिर्देशन पत्रे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झाली आहेत. यासह आतापर्यंत दाखल झालेल्या एकुण अर्जाची संख्या ४८ झाली आहे. उद्या सुट्टी- दि. २८ डिसेंबर रोजी रविवार असल्याने अर्ज विक्री आणि स्विकृती बंद राहणार असून, दि. ३० डिसेंबर ही अर्ज भरण्याची अंतिम तारीख असेल. वेळेची मर्यादा - दि. ३० डिसेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंतच कडे नवीन अर्जाची विक्री केली जाणार असून, भरलेले अर्ज दुपारी ३ वाजेपर्यंतच स्विकारले जातील. इच्छुकांनी वेळेची ही मर्यादा पाळून आपले अर्ज वेळेत दाखल करावेत, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.प प्रशासकीय' देखरेख कायम जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली पाचही निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात चोख व्यवस्था ठेवण्यात आली आहे. प्रत्येक अर्जाची तांत्रिक बाजू आणि आचारसंहितेचे पालन यावर प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे. पारदर्शक निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज असल्याची माहिती निवडणूक कक्षाकडून देण्यात आली आहे.

# अहिल्यानगर वन विभागाचे भरारी पथक कागदावरच?

## अवैध लाकूडतोड व वाहतुकीकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप

अहिल्यानगर । प्रतिनिधी

शेवगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध लाकूडतोड व वाहतुकीच्या प्रकारांमुळे अहिल्यानगर वन विभागाच्या भरारी पथकाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. भरारी पथक केवळ नावापुरते अस्तित्वात असून प्रत्यक्षात प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शेवगाव परिसरात लाकूडतोड करणाऱ्या टोळ्या खुलेआम कार्यरत असल्याचे चित्र दिसून येत आहे. अनेक ठिकाणी तोडलेले लाकूड कोणत्याही अधिकृत टॅगशिवाय वाहतूक केले जात असून संबंधित वाहनांकडे आवश्यक परवाने नसल्याची माहिती समोर येत आहे. तरीही या प्रकारांकडे वन विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

सूर्यास्तानंतर अवैध लाकूड वाहतुकीचे प्रमाण वाढत असून नगर, पुणे, कल्याण, बीड, गेवराई, गुजरात आदी ठिकाणी लाकूड पाठवले जात असल्याचे सांगितले जात आहे. रात्रीच्या वेळी लाकूड कापणे, साठवणूक व वाहतूक सुरू असल्याने वन विभागाच्या गस्त व तपासणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अवैध लाकूड तोडीमुळे वन संपदेचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत असून पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत आहे. तसेच शासनाच्या महसुलाला ही मोठा फटका बसत आहे. असे असतानाही प्रभावी कारवाई न झाल्याने भरारी पथकाच्या कार्यक्षमता, सतर्कता व जबाबदारीवर प्रश्न निर्माण झाले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून भरारी पथकाच्या कामकाजाचे स्वतंत्र ऑडिट करावे, तसेच अवैध लाकूडतोड व वाहतुकीवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिक व पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे.

# जिल्ह्यातील जैन समाजाची जनगणना अंतिम टप्यात

जालना। प्रतिनिधी

भारतीय जैन संस्था, जालना च्या विश्वस्त मंडळाची बैठक अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ डिसेंबर २०२५ रविवार रोजी जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे घेण्यात आली. बैठकीचे प्रास्ताविक करताना श्री बंब म्हणाले मागील वर्षापासून नव्याने समाजाची जनगणना प्रारंभ करण्यात आली होती. हे जनगणना शहरी, तालुका व ग्रामीण भाग असे तीन टप्यात करण्यात आली. या दहा वर्षात अनेक कुटुंबात नवीन पिढी आलेली आहे. अनेकांचे पत्ते, मोबाईल नंबर इ. मध्ये बदल झालेला आहे. सध्या समाजात नाते - लग्न जुळविणे फार अवघड व गंभीर प्रश्न आहे, म्हणून पारिवारीक माहितीची जनगणना सोबत विवाह योग्य मुला-मुलीं उमेदवारांची



माहिती सुध्दा संकलन करण्यात आली आहे. वधु-वर सुचक केन्द्र सुध्दा काळाची गरज आहे. शहर आणि ग्रामीण भागात जवळ-पास २००० कुटुंब आहे, १०००० हजार जनसंख्या आहे. विधवा - विधुर, घटस्फोटित, अपंग, विकलांग असे दीन दुःखी उमेद्वारांची सुध्दा माहिती गोळा करण्यात आली आहे. त्यांचे सम्मेलन घेऊन पुर्नःविवाह करण्यात येईल. जैन समाजाला अल्पसंख्यांक दर्जा असल्याने आर्थिक दृष्टीने दुर्बळ घटकांना विशेष करून गोर-गरीब होतकरु विद्यार्थ्यांसाठी शासकीय किंवा खाजगी शिष्यवृत्ती अनेक योजना आहे. त्यांना मदतीसाठी मदत केन्द्र उघडण्यात आले आहे, असे बंब म्हणाले.

प्रारंभी कचरुलाल नवलखा यांनी नमस्कार महामंत्री सादर केले, सचिव ॲड. अभय सेठिया यांनी मागील बैठकीचे वृतांत सादर करून आजच्या बैठकीचे उद्देश्य सांगितले. कोषाद्यक्ष विजयराज सुराणा यांनी आवक - जावक हिशोब सादर केला. उपाध्यक्ष नरेन्द्र मोदी, सुदेश सकलेचा यांनी विचार मांडले. पुढे बोलताना बंब म्हणाले अधिकांश जनगणना पुर्ण होण्याच्या मार्गाने आहे. पारिवारीक माहितीची व दैनंदिन लागणारी आवश्यक माहिती रुग्णवाहिका, स्वर्गरथ, रक्तपेढी, ट्रव्हल्स, पोलिस कार्यालय, पाणी पुरवठा, रुग्णालय, इलेक्ट्रीसिटी वितरण इ. संपर्क नंबर यात राहील. प्रत्येकाच्या सुखा दुःखात संपर्कासाठी दिशा-निर्देशिकाचा फार मोठा महत्व आहे. लवकरच जिल्ह्यातील समाजाची दिशा-निर्देशिका प्रकाशित करून निःशुल्क वितरण करण्यात येईल. ज्या कुटुंबानी जनगणनाची माहिती नाही दिल्यास त्यांनी ताबडतोब ५ जानेवारी पर्यंत उपरोक्त पदाधिकाऱ्या कडे माहिती देणे अनिवार्य आहे, नाही तर पुस्तकात त्यांचे नांव येणार नाही.

या बैठकीसाठी विनोद बंब, सतिष बोथरा, राजेन्द्र सावजी, ताराचंद कुचेरिया यांनी परिश्रम घेतले. बैठकीचे सुत्र संचालन व आभार बसंतीलाल गोलेच्छा यांनी मांडले.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ७६७/२०२५**

**अंकुश अर्जुनराव कोटुळे**

**ग्रामपंचायत कार्यालय वरवटी/आहेरधानोरा**

पहा

१.अंकुश अर्जुनराव कोटुळे रा. वरवटी ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक अजय अंकुश कोटुळे यांचा दिनांक २०/१०/२०१० रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस वरवटी/आहेरधानोरा ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वरवटी/आहेरधानोरा ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक २२/१२/२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०१/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७०४
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- ०४/१२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)योगेश एकनाथराव कनके २) शोभाबाई एकनाथराव कनके सर्व्हे नं.-४५१ प्लॉट नं. १६ नं.प.मि.नं.१८-१८०-१६ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१८०-१६) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ९ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. ९,१० व ११
दक्षिण- प्लॉट नं. १५
उत्तरः प्लॉट नं. १५

**स्वाक्षरित**
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# अहिल्यानगरमध्ये युवा सेनेच्या जिल्हाप्रमुखावर रिव्हॉल्वरने जीवघेणा हल्ला ; गुन्हा दाखल

अहिल्यानगर । प्रतिनिधी

एमआयडीसी येथील सनफार्मा चौक परिसरात भरदिवसा थरारक प्रकार घडत सामाजिक कार्यकर्ते तथा युवा सेनेचे जिल्हाप्रमुख योगेश गलांडे यांच्यावर रिव्हॉल्वर व कोयत्याने जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणी चिरंजीव दत्तात्रय गाढवे (रा. बोल्हेगाव फाटा, एमआयडीसी) व त्याच्या चार अनोळखी साथीदारांविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना शनिवार, दि. २७ डिसेंबर रोजी सकाळी साडेनऊ ते दहाच्या सुमारास घडली. गलांडे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. योगेश गलांडे यांचे आरोपी चिरंजीव गाढवे यांच्याशी पूर्वीपासून ओळख असून जुन्या वादातून त्यांच्यात तणाव होता. शनिवारी सकाळी योगेश गलांडे हे त्यांच्या चारचाकी वाहनातून (एम.एच. १६ बी.वाय. ०००९) घरातून गजानन कॉलनी, नवनागापूर येथील स्वराज्य कामगार संघटनेच्या कार्यालयाकडे निघाले होते. वाहन चालवित असताना त्यांचा पुतण्या वैष्णव गणेश गलांडे हा चालक होता.सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास सनफार्मा चौक येथे समोरून एक निळ्या रंगाची, विना नंबरची बलेनो कार आडवी आली. त्या कारमधून चार इसम उतरले. त्यापैकी दोघांच्या हातात कोयते होते. त्यांनी गलांडे यांच्या वाहनाला चारही बाजूंनी घेराव घातला. दरम्यान, बलेनो कारच्या पुढील सीटवर बसलेला आरोपी चिरंजीव गाढवे याने हातातील रिव्हॉल्वर दाखवत योगेश गलांडे यांना ''तू फार माजलाय, तुला आज जिवंत सोडणार नाही,'' अशी जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर आरोपीने आपल्या साथीदारांना ''आज यांना सोडायचे नाही,'' असे सांगितले. त्यावर आरोपींच्या साथीदारांनी कोयत्याने योगेश गलांडे व वैष्णव गलांडे यांच्यावर वार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, प्रसंगावधान राखत वैष्णव गलांडे यांनी वाहन मागे घेतले. तरीही कोयत्याचे वार वाहनाच्या समोरील काच व बोनेटवर झाले. तसेच वाहनाच्या पाठीमागील काचेवरही कोयत्याचा वार होऊन मोठे नुकसान झाले. हल्लेखोरांनी पुन्हा वाहनावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने प्रसंग ओळखून वाहन वेगात काढत जीव वाचवला. तेथून निघून जात असताना आरोपी चिरंजीव गाढवे याने ''आज वाचलास, पुन्हा माझ्या हाती लागलास तर तुला जिवे ठार मारीन,'' अशी पुन्हा धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या थरारानंतर योगेश गलांडे व त्यांचे पुतणे थेट एमआयडीसी पोलीस ठाण्यात दाखल झाले. त्यांच्या फिर्यादीवरून चिरंजीव दत्तात्रय गाढवे व त्याच्या चार अनोळखी साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिसांच्या नाटक बाजी मुळे वेश्या व्यवसायचा अड्डा खुलेआम सुरू?

मंठा। प्रतिनिधी

काही पोलिसांच्या नाटक बाजी मुळे मंठा परिसरात वेश्याव्यवस्था अड्डा सुरू आहे बंद करण्यासाठी वारंवार मागणी करण्यात येत आहे परंतु जाणून-बुजून पोलिसांच्या दुर्लक्षामुळे सदरील वेशाचा अड्डा सुरू असल्याचे बोलल्या जात आहे. मंठा शहरात बेकायदेशीर वेश्या व्यवसाय पुन्हा एकदा खुलेआम सुरू झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, पोलिस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांनी यापूर्वी कठोर कारवाईचे आश्वासन दिले असताना, त्यांच्या शब्दांना अक्षरशः केराची टोपली दाखवत हा व्यवसाय पुन्हा सुरू झाल्याचे चित्र आहे. याप्रकरणी पोलीस अधीक्षक येणे तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी सर्व नागरिकाकडून करण्यात येत आहे. नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारीनंतर मागील पंधरा दिवसांपूर्वी संबंधित वेश्या व्यवसाय बंद करण्यात आला होता. त्यामुळे शहरातील महिला, युवती व पालक वर्गाने काहीसा दिलासा व्यक्त केला होता. मात्र, आजपासून पुन्हा हा व्यवसाय सुरू झाल्याने पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

शहरातील वर्दळीच्या भागात खुलेआम सुरू असलेल्या या बेकायदेशीर धंद्यामुळे सामाजिक वातावरण दूषित होत असून, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, तरुण वर्ग आणि महिलांच्या सुरक्षिततेचा गंभीर मुद्दा या निमित्ताने पुढे आला आहे. ''पोलिस कारवाई झाली, असे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात काहीच बदल दिसत नाही. तात्पुरती कारवाई करून पुन्हा व्यवसाय सुरू होतो, हे नेमके कोणाच्या आशीर्वादाने?'' असा सवाल संतप्त नागरिक करत आहेत.

# अंगारीका चतुर्थीच्या आढावा बैठकीत दानवेकडून संस्था व्यवस्थापनाविरुद्ध नाराजी व्यक्त

राजूर । प्रतिनिधी

येत्या ६ जानेवारी रोजी अंगारकी वतुर्थीनिमीत्त राजूरेश्वराच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून काय उपाययोजना केल्या, असा सवाल माजी केंद्रिय मंत्री रावसाहेब दानवे यांनी आयोजित आढावा बैठकीत खाते प्रमुखांना विचारत कानउघाडणी केली. व तसेच संस्थान व्यवस्थापन बाबत नाराजी व्यक्त केली आता यानंतर मला सुधारणा झालेली दिसून आले पाहिजे नसता संबंधित वर कठोर कारवाई करण्यात येईल व तसेच जबाबदार धरण्यात येईल. दि. ६ डिसेंबर रोजी अंगारीका चतुर्थी असून, नविन वर्षाच्या पहिल्याच महिन्यात येणाऱ्या या अंगारिका चतुर्थीला भाविकांची गर्दी उसळण्याचा अंदाज आहे. हिवाळयाचे दिवस असल्याने भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी संस्थानकडून उपाययोजना केल्या जात आहेत. १० दिवसापुर्वी विविध खातेप्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली होती.

यावेळी आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार काय केले, असा सवाल आजच्या आढावा बैठकीत श्री. दानवे यांनी खातेप्रमुखांना विचारला. राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजकातील बंद असलेले पथदिवे, बसस्थानकात असलेली गैरसोय याबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. येत्या ४ दिवसांत पथदिवे सुरु न केल्यास या काळात काही अनुचित प्रकार घडल्यास संबधितांना जवाबदार धरले जाईल, असा ईशाराही त्यांनी दिला. १० दिवसापूर्वी खातेप्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली होती. त्यावेळी दिलेल्या सुचनांची आतापर्यंत कुणीच गांभीर्याने दखल घेवून उपाययोजना राबवल्या नसल्याचे दिसून आले. त्यामुळे श्री. दानवे चांगलेच संतप्त झाले होते. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी आणि एसटी महामंडळाच्या आगारप्रमुखांची त्यांनी मोबाईलवरून चांगलीच खरडपट्टी काढली. गणेश भक्त अंगारीका चतुर्थीचे दर्शन महत्वाचे मानतात. त्यामुळे राजुरेश्वराच्या दर्शनासाठी मोठी गर्दी ऊसळण्याचा अंदाज आहे. चतुर्थीला होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही, यासाठी असून, व्यापारी संकुलातून दर्शन रांगा तयार करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. यानिमित्ताने पोलीस बंदोबस्त, मंदिर परिसरात सिसिटीव्ही बसवणे, आरोग्य सेवा, जादा बसेस, पिण्याचे पाणी, अग्नीशामक दल, थंडीपासून बचावासाठी मंदिर परिसरात शामीयाना, दर्शन रांगा, वाहनतळ, सुरळीत विजपुरवठा, फिरते स्वच्छतागृह, फिरते आरोग्य पथक, मुख्य रस्त्यावरील पथदिवे, विजेच्या लोंबकळणाऱ्या तारा, पादत्राने ठेवण्याची सुविधा, सेवेकरी, स्वयंसेवक या विषयाचा आढावा घेवून तहसिलदार ज्ञानेश्वर काकडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर, सहाय्यक पोलीस निरिक्षक संजय अहिरे यांनी उपस्थितांना आवश्यक त्या सुचना दिल्या. यावेळी फौजदार अर्चना भोसले, राजुरेश्वर संस्थानचे व्यवस्थापक गणेश साबळे, कार्यालयीन अधिक्षक प्रशांत दानवे यांच्यासह प्रमोद पुंगळे, अदित्य खंडीझोड, डॉ. कावले, सारंगधर बोडखे, एन. एन. पठाण, तलाठी विजय गरड, कृष्णा कदम, रामेश्वर शिनकर यांची उपस्थिती होती.

cmyk

# तहसीलदार शेळके मोरगावला शेतकऱ्यांच्या बांधावर

## अतिक्रमणांसोबतच शेत रस्त्याची केली पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

**मांजरसुंबा महसूल मंडळातील मोरगाव येथे सोमवार दिनांक २९ रोजी प्रशासन प्रत्यक्ष गावात उतरल्याचा अनुभव नागरिकांना मिळाला . हा अनुभव केवळ बैठकीपुरता मर्यादित न राहता , थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन समस्या पाहण्याचा आणि त्या सोडवण्याचा ठरला . तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी मोरगाव येथे गावातील अतिक्रमण , शेतातील रस्ते , तसेच नागरिकांनी मांडलेल्या विविध तक्रारींची जागेवर पाहणी करत प्रशासनाची लोकाभिमुख भूमिका स्पष्ट केली .**

ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही नेहमीच्या सरकारी औपचारिकतेपेक्षा वेगळी ठरली . शेतकरी , महिला , वृद्ध , तरुण , लोकप्रतिनिधी आणि अधिकारी एकाच छताखाली बसून थेट संवाद साधताना दिसले . कुणाच्या हातात अर्ज होते , कुणाच्या डोळ्यात प्रश्न होते , तर कुणाच्या मनात केवळ अपेक्षा होती की आज तरी आपली अडचण ऐकली जाईल. 'प्रशासन गावाकडे '' ही संकल्पना मोरगावमध्ये कागदावर नव्हे , तर प्रत्यक्ष कृतीत उतरलेली दिसली . राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार प्रशासन लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे , समस्या कार्यालयात नव्हे तर जागेवर सुटल्या पाहिजेत , हा संदेश शासनाने ठामपणे दिला आहे . त्याच धर्तीवर छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल यंत्रणा गावपातळीवर सक्रिय झाली आहे . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सातत्याने दिलेला '' सेवा ही कागदात नाही , तर माणसाच्या आयुष्यात दिसली पाहिजे '' हा संदेश मोरगावच्या कारवाईत प्रत्यक्षात उतरल्याचे चित्र दिसले . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढाव्याचा ठसा या संपूर्ण प्रक्रियेत जाणवत होता .



या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . मात्र त्यांनी फक्त सभागृहात बसून तक्रारी ऐकून घेणे इतक्यावर न थांबता , नागरिकांनी मांडलेल्या अतिक्रमणाच्या तक्रारी आणि शेतातील रस्त्याच्या समस्यांबाबत थेट जागेवर जाऊन पाहणी केली . गोविंद जाधव आणि सुंदर भड यांनी रस्त्याची समस्या मांडताच तहसीलदार शेळके यांनी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह शेतातील रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली . रस्ता खुला करून दिला जाईल आणि अडथळे दूर करण्यात येतील , अशी ठाम हमी त्यांनी गावकऱ्यांना दिली. पाणी, शेती, महसूल दाखले, ओळखपत्रे , शासकीय योजना , पीकविमा , ॲग्रीस्टॅक , जमीन विषयक प्रश्न यावर तहसीलदारांनी समजेल अशा भाषेत मार्गदर्शन केले . कुठे तात्काळ उपाय सुचवले , तर कुठे प्रक्रिया स्पष्ट करून पुढील कार्यवाहीची दिशा दाखवली . या संवादातून अनेक नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि दिलास्याची भावना दिसून आली. या आढावा बैठकीत ग्राम महसूल अधिकारी लक्ष्मण ओव्हाळ यांनी कार्यक्रमाची रूपरेषा आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती प्रास्ताविकातून दिली. यावेळी मंडळ अधिकारी श्रीमती सोनाली कदम, माणिक पांढरे, रेश्मा तानगे, आशा घाडगे, अविनाश माळवे, अनिल गायकवाड , ग्रामपंचायत अधिकारी कडू पाटील, सरपंच लता जाधव, उपसरपंच मोरगाव तसेच महसूल सेवक बिरलिंगे, काकडे उपस्थित होते. पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी थेट मांडल्या. ◀◀ पान ३ वर

# गंगामसला फाटा ते सुरूमगांव रस्त्याची दुरावस्था

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला फाटा ते सुरूमगांव या सात किमी रस्त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे.

एका महिन्यापुर्वी खडी व मुरूम टाकुन दबई केलेल्या रस्त्याची खडी उकडुन वर आली आहे. यामुळे येजा करणार्या मोटर सायकल स्वारांची मोठी दमछाक होत असुन कित्येक वेळा मोटर सायकल घसरून बरेच लोक जखमी झाले आहेत. रस्त्यावरून मोठे वाहन गेले की मोठ्या प्रमाणात धुळ उडवत आहे. या धुळीने ये-जा करणार्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या रस्त्यावर पाणी टाकुण रस्त्याची दबई करण्याची मागणी परिसरातील ग्रामस्थांकडुन केली जात आहे.



परिसरातील नागरीकांना ये-जा करतांना रस्त्यावरच्या खडी व धुळीचा भरपुर त्रास सहन करावा लागत आहे. वांरवार संबंधित गुत्तेदारांना सांगुनही याकडे ते जाणीव पुर्वक दुरलक्ष करीत असल्याचे सरपंच शिवकुमार माने यांनी सांगितले.

# जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजी जिल्हा परिषद सभापती तथा युवकांचे प्रेरणास्थान जयसिंह सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते सुंदर सोळंके यांनी केले आहे.



धारूर तालुक्यातील हिंगणी येथील ग्रामपंचायत सदस्य तथा जिल्हा परिषद शाळेचे शालेय व्यवस्थापन समिती सदस्य सतत सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. माझी जि.प. सभापती व सुंदरराव सहकारी साखर कारखाना व्हॉइस चेअरमन जयसिंह सोळंके यांचा मंगळवारी वाढदिवसाचे औचित्य साधत सुंदर सोळंके यांनी ढेकणमोहा येथील पसायदान अनाथालयातील मुलांना अन्नदानाचा उपक्रम राबवत हिंगणी येथील गरजू मुलांना गणवेश व शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचप्रमाणे चांगल्या प्रतीची वृक्ष लागवड मंगळवारी हिंगणी येथे करण्यात येणार असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन सुदर्शन उर्फ सुंदर सोळंके यांनी केले आहे. नेत्याच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम राबवल्यामुळे सोळंके यांचे कौतुक होत आहे.

# प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या कापूस ऑनलाईन प्रक्रियेची व्यवस्था करा-आमटे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा कापूस व सोयाबीन पिकासाठी ओळखला जातो. मात्र सीसीआयकडे कापूस विक्रीसाठी आवश्यक असलेली ऑनलाईन प्रक्रिया शेतकऱ्यांना स्वतः करता येत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे प्रत्येक जिनिंगवर शेतकऱ्यांच्या वतीने ऑनलाईन नोंदणी, सातबारा अपलोड, बाजार समितीची संमती व स्लॉट बुकिंग ही संपूर्ण प्रक्रिया जिनिंगमार्फतच करून देण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी केली आहे.



तसेच बीड जिल्ह्याच्या ठिकाणी चार्जिंगला मान्यता असतानाही एकही जिनिंग पूर्णवेळ सुरू नाही, ही गंभीर बाब आहे. यामुळे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी माजलगाव, केज, धारूर अशा दूरच्या ठिकाणी जावे लागत असून वेळ, खर्च व त्रास वाढत आहे. माजलगाव मध्ये आठ जिनिग पूर्ण वेळ सुरु आहेत मग बीड जिल्ह्याच्या ठिकाणी एक हि जिनिग पूर्णवेळ सुरू का नाही?

सीसीआय प्रशासनाने तात्काळ बीड येथील जिनिंग पूर्णवेळ सुरू कराव्यात, जेणेकरून शेतकऱ्यांची होणारी हेळसांड थांबेल, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. ही मागणी राजेंद्र आमटे, गणेश ढवळे,अशोकरावजी येडे, अर्जुन सोनवणे, राहुल साळुंखे, खाजाभाई पठाण, दिलीप शिंदे, विक्रम शिंदे, रमेश गुंड, नानासाहेब कडबाने, मोहन गव्हाणे, संपत गव्हाणे, राजू गायके, सुहास जायभाय, गणेश नाईकवाडे, राजू वीर, किरण सोळुंके, राजू सोळुंके, श्रीराम खुरणे, गोविंद तीपाले, महेंद्र तीपाले, गोरख टेकाळे आदी शेतकरी बांधवांच्या वतीने करण्यात आली आहे.

# तेली समाजभूषण राज रायते यांच्या गायनाच्या तालावर गडचिरोलीकर थिरकले

**बीड । प्रतिनिधी**

२७ डिसेंबर रोजी श्री संताजी जगनाडे महाराज जन्मोत्सव समिती, गडचिरोली तेली समाज बांधव आयोजित सुप्रसिद्ध गायक, तेली समाजभूषण राज प्रल्हादराव रायते यांचा भव्य गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी राज याच्या गायनाने गडचिरोलीकर अक्षरशा थिरकताना दिसले.

कार्यक्रमाच्या आधी गायक राज रायते यांचा मोठ्या उत्साहात सत्कार समारंभ पार पडला. यावेळी महाराष्ट्र प्रांतीक तेली समाज अध्यक्ष गडचिरोली



प्रभाकर वासेकर तसेच नगराध्यक्ष योगितताई पिंपरे व अनेक प्रमुख मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. गायक राज रायते यांच्या गायनाच्या कार्यक्रमात रसिक प्रेक्षकांनी मनमुराद आनंद घेतला. यावेही मंत्रमुग्ध झालेल्या रसिकांनी राज रायते यांच्या गायनावर जल्लोष करताना चांगलाचा ताल धरल्याचे दिसून आले. श्री संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्यावर आधारित असलेले राज रायते यांचे सुप्रसिद्ध गीत या ठिकाणी सादर करण्यात आले. या गीताला संपूर्ण तेली समाज बांधवांनी खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. राज यांची संपूर्ण टीम या ठिकाणी उपस्थित होती. यामध्ये त्यांचे वडील प्रल्हाद रायते तसेच वाद्यवृंद गुरु सचिन राऊत, पवन शिंदे, संजय कागदे, आणि विजय कोरडे उपस्थित होते. वाद्यवृंदांनीही आपल्या सुमधुर कलाने रसिकांचे मन जिकले. कार्यक्रम संपल्यानंतर राज रायते यांना भेटण्यासाठी प्रचंड गर्दी या ठिकाणी पाहवयास मिळाली. विदर्भातून राज रायते यांचे चाहते या कार्यक्रमास उपस्थित राहिले होते. बीडचा उभराता गायक म्हणून राज रायते याच्याकडे बघितले जात आहे. दिवसेंदिवस त्याला मिळणारी प्रसिद्धी आणि प्रगती दखल घेण्यासारखी आहे.

# अवैध वाळू उपसा करणाऱ्या दोघांविरुद्ध कारवाई

## एरंडगाव येथे जेसीबी ट्रॅक्टरसह वाळू साठा जप्त

बीड । प्रतिनिधी

सिंदफणा नदीपात्रामध्ये चोरट्या पध्दतीने सुरु असलेल्या अवैध वाळू उपशावर कारवाई केलेबाबत

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी बीड जिल्ह्यामधील अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी, अंमलदार यांना आदेशित केले होते. त्याच अनुशंगाने अवैध धंद्यांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन गेवराई परीसरातील पाचेगाव बीट हद्दीमध्ये



दिनांक २७/१२/२०२५ रोजी सुरु असलेल्या पेट्रोलिंग दरम्यान पोलीस स्टेशन गेवराई येथील पोलीस पथकास गोपनिय माहिती मिळाली की, एरंडगाव शिवारातील सिंदफणा नदीपात्रामध्ये विनापरवाना जेसीबी मशीनचे सहाय्याने चोरुन वाळु उपसा सुरु असुन ट्रॅक्टरद्वारे तो विक्रीच्या उद्देशाने घेवुन जात आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाल्यावरुन एरंडगाव, ता-गेवराई शिवारातील सिंदफणा नदीपात्रामध्ये अवैध चोरीचा वाळु उपशावर दुपारी ०४.३० वा चे सुमारास रेड केली असता सदर ठिकाणी ट्रॅक्टर चालक परीक्षीत कल्याणराव पाटील, वय-३१ वर्षे, धंदा-शेती, रा-कुर्ला, ता, जि-बीड व जेसीबी मशिन चालक शुभम महादेव कानडे, वय-२० वर्षे, धंदा-चालक, रा-ब-हाणपुर, ता, जि-बीड यांचे ताब्यातुन निळ्या रंगाचे एक सोनालिका कंपनीचे ट्रॉलीसह ट्रॅक्टर किंमत ८,००,०००/-रु, त्याचेमध्ये ◀◀ पान ३ वर

# शृंगेरी देवी यात्रा उत्सवास ३ जानेवारीपासून प्रारंभ; ४ जानेवारीला रंगणार कुस्त्यांची भव्य दंगल

आष्टी । प्रतिनिधी

तालुक्यातील ब्रह्मगाव येथील प्रसिद्ध आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शृंगेरी देवीचा वार्षिक यात्रा उत्सव शनिवार, दिनांक ३ जानेवारी (पौष पौर्णिमा) पासून मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. हा उत्सव पुढील १५ दिवस चालणार असून, यात्रेचे खास आकर्षण असलेली भव्य कुस्त्यांची दंगल रविवार, ४ जानेवारी रोजी पार पडणार असल्याची माहिती शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विजय



हराळ (फौजी) यांनी दिली आहे.

ब्रह्मगावचे शृंगेरी देवी देवस्थान हे केवळ जिल्ह्यातच नव्हे, तर राज्यभरात भाविकांचे श्रद्धास्थान आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही पौष पौर्णिमेपासून यात्रेला सुरुवात होत असून, पौष अमावस्येला या उत्सवाची सांगता होईल. या १५ दिवसांच्या कालावधीत मंदिरात अभिषेक, महापूजा, आरती आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रा उत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ४ जानेवारी रोजी आयोजित करण्यात ◀◀ पान ३ वर

# सोयाबीन खरेदी केंद्रावर तात्काळ बारदाना उपलब्ध करा -प्रा. आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक २९ १२ २०२५ बीड जिल्ह्यात पणन महासंघा मार्फत सुरू करण्यात आलेल्या सोयाबीन खरेदी केंद्रावर बारदाना कमी पडत आहे त्यामुळे सोयाबीन खरेदी बंद झालेली आहे या खरेदी केंद्रावर तातडीने बारदाना उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.



बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन पिकाची लागवड करण्यात आलेली आहे खरेदी केंद्रावर सोयाबीनची अचानक आवक मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे परंतु जिल्ह्यातील पणन महासंघाच्या ४८ खरेदी केंद्रावर मागील ◀◀ पान ३ वर

# नवीन वर्षाची सुरुवात हरिनामाने

## दि.३१ डिसेंबर ते १० जानेवारी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे कीर्तन महोत्सव

बीड । प्रतिनिधी

भारतीय संस्कृती ही जगातील सर्वोत्तम संस्कृती असून तिचे जतन व संवर्धन व्हावे, तसेच पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण टाळावे या उद्देशाने गेल्या २५ वर्षांपासून बीड शहरात हॅपी न्यू इयर भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून साजरा केला जात आहे. याच परंपरेनुसार यावर्षीही ३१ डिसेंबर ते १० जानेवारी या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



या अकरा दिवसीय महोत्सवात सकाळी ११ ते ४ या वेळेत पाच दिवस तीर्थ महात्म्य कथा संपन्न होणार असून, महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राबाहेरील पवित्र तीर्थक्षेत्रांचे महात्म्य या कथांमधून उलगडले जाणार आहे. या कथा साध्वी ह.भ.प. वैभवी श्रीजी (वृंदावन धाम) सादर करणार आहेत. तसेच सायंकाळी ४ ते रात्री ९ या वेळेत पाच दिवस चाणक्य नीति कथा होणार असून, दैनंदिन व सांसारिक जीवनात मार्गदर्शक ठरणाऱ्या या कथांचे निरूपण ह.भ.प. प्रसाद महाराज काष्टे (सेलू, परभणी करणार आहेत. यानंतर महाराष्ट्रातील ख्यातनाम आठ सांप्रदायिक कीर्तनकार आपली कीर्तन ◀◀ पान ३ वर

# कला महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधून कलाकार निर्माण होतील -माजी आ.भीमराव धोंडे

## आत्मविश्वास आणि सातत्य हाच यशाचा खरा मार्ग –सुप्रसिद्ध अभिनेत्री हेमांगी कवी

कडा । प्रतिनिधी

राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या माध्यमातून आष्टी सारख्या ग्रामीण भागातील युवकांमधून कलाकार निर्माण होण्यास मदत होईल, आई-वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी सातत्याने प्रगती करावी असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथील भगवान महाविद्यालयात आयोजित राज्यस्तरीय गंगाई बाबाजी रौप्य कला महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते.

राज्यस्तरीय कला रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने सकाळी आष्टी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर सिनेअभिनेत्री हेमांगी कवी,सौ. दमयंतीताई धोंडे, युवानेते अजयदादा धोंडे,सौ. अक्षताताई धोंडे,अभयराजे धोंडे,चेअरमन राजुकाका धोंडे, जि.प.चे माजी सदस्य सतिश शिंदे, माजी सभापती नियामत बेग, किशोरनाना हंबर्डे,धैर्यशील थोरवे, ॲड.रत्नदीप निकाळजे, रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, हरिभाऊ जंजिरे, सरपंच अशोक मुळे, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, आण्णासाहेब भोसले,ह.भ.प. दिनकर महाराज तांदळे,पत्रकार भगवान राऊत,उत्तम बोडखे, दिलीप काळे,सरपंच सावता ससाणे,संतोषभैया चव्हाण, अश्ताक शेख,स्वामी सानप,अज्जुभाई शेख,प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, प्राचार्य सुरेश बोडखे,भाग्यश्री राऊत,सरपंच दादासाहेब जगताप, प्रा.अल्लाउदिन सय्यद, युवराज वायभासे, आदेश निमोणकर

संस्थेचे सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की,ग्रामीण भागातील मुलांच्या अंगी भरपूर वेगवेगळे कलागुण असतात.या महोत्सवाच्या माध्यमातून



अशा कलागुणांना वाव मिळण्याची संधी आहे. कष्टकरी आणि गोरगरिबांची मुले कला क्षेत्राकडे वळावेत या हेतूने गेल्या २५ वर्षापासून गंगाई बाबाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रामीण भागात मुले शिकुन उच्च शिक्षित व्हावेत. आपला परिसर हा दुष्काळी आहे उच्च शिक्षण घेतले तर नौकरी व्यावसायाच्या माध्यमातून प्रगती करता येईल. महोत्सवाच्या माध्यमातून कलाकार निर्माण होतील. जिवनात कष्टाशिवाय यश मिळत नाही. आई वडिलांना आपले पालनपोषण करण्यासाठी खुप कष्ट करावे लागले. आपणही तेच न करता भरपूर शिक्षण घेऊन नियमित अभ्यास करावा व आई वडिलांचे नावलौकिक करावे. दिवसातील पाच तास चांगला मन लावून अभ्यास केला तर स्पर्धा परिक्षेत यश निश्चितच मिळते.भावी पिढीतून चांगले कलावंत घडावी हाच महोत्सवाचा मुख्य उद्देश आहे. इंग्रजी भाषेत किर्तन प्रवचन करण्यासाठी जुन महिन्यापासुन त्या शिक्षणाची सोय करण्यात येईल.जेणेकरून आपल्या भागातील विद्यार्थी इंग्रजी भाषेत अध्यात्मिक शिक्षण घेऊन देशभरात व परदेशात किर्तन प्रवचन करतील. प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना अभिनेत्री हेमांगी कवी यांनी सांगितले की,थोर महापुरुषामुळे आपण येथे आहोत दुष्काळी आणि एवढ्या ग्रामीण भागात माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षणाची गंगा आणली ही बाब खरोखरच कौतुकास्पद आहे. माझ्या अभिनयापेक्षा ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

मंगळवार दि.३० डिसेंबर २०२५ | पान ७



# २५ जणांचे अर्ज भरा, एकनाथ शिंदेंचा शिवसैनिकांना आदेश; पुण्यात भाजपविरोधात शिवसेना आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्यास फक्त एकच दिवस शिल्लक असूनही पुण्यात शिंदेंची शिवसेना आणि भाजप एकत्र लढण्याविषयी कोणतीही स्पष्टता नाही. २५ जागांसाठी आग्रही असलेल्या शिंदच्या शिवसेनेला भाजपकडून केवळ १५ जागांचा प्रस्ताव देण्यात आला असल्याची माहिती आहे. त्यामुळे शिंदेंची शिवसेना आक्रमक झाल्याचं चित्र आहे. एकनाथ शिंदेंनी २५ जणांचे अर्ज भरुन घेण्याचे आदेश दिले आहेत.



महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सेनेने २५ इच्छुकांना फॉर्म भरायला सांगितल आहे. सेना आणि भाजपमध्ये शेवटच्या क्षणापर्यंत जागेवरून वाटाघाटी सुरू दिसत आहे. शिंदेंच्या शिवसेनेने २५ जागा मागितल्या असून भाजप त्यासाठी तयार नाही. त्यामुळे ऐनवेळी कोणतीही गडबड नको म्हणून सध्या सेनेतील २५ इच्छुक फॉर्म भारत आहेत. पुण्यामध्ये भाजपकडून शिवसेनेची, विशेषतः रवींद्र धंगेकरांची कोंडी केली जात असल्याचा आरोप केला जातोय. भाजपकडून जास्त जागा मिळण्याची शक्यता नसल्याने रवींद्र धंगेकरांनी अजित पवारांची भेट घेतली आहे. शिंदेंच्या शिवसेनेने अजित पवार यांच्या राष्ट्रवादीसमोर युतीचा प्रस्ताव ठेवल्याची माहितीही समोर येत आहे. तर दुसरीकडे शिवसेनेची भाजपसोबत जागावाटपासंदर्भात चर्चाही सुरू आहे. भाजपवर दबाव निर्माण करण्यासाठीच धंगेकरांनी अजित पवारांची भेट घेतल्याची चर्चादेखील सुरू आहे. पुण्यातील प्रभाग क्रमांक २४ मध्ये रवींद्र धंगेकरांचा मुलगा प्रणव आणि पत्नी प्रतिभा धंगेकर या उमेदवारीसाठी आग्रही होत्या. परंतु त्या ठिकाणी भाजपने त्यांचे दोन्ही उमेदवार जाहीर केल्यामुळे धंगेकरांच्या कुटुंबातील कुणालाही तिकीट मिळणार नसल्याचं स्पष्ट होतंय.त्यामुळे आता धंगेकरांचा मुलगा प्रणव धंगेकर अपक्ष लढण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. या दोघांनाही महायुतीत उमेदवारी मिळावी यासाठी रवींद्र धंगेकरांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत प्रयत्न केले. मात्र, भाजपने प्रभाग २४ मध्ये दोघांनाही उमेदवारी न देऊन त्यांची राजकीय कोंडी केली. भाजपने या प्रभागात गणेश बीडकर, रविंद्र वडके,कल्पना बहिरट, उज्वला यादव यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे त्यामुळे आता पत्नी आणि मुलाला महापालिका निवडणुकीच्या रिंगणात उतरवायचं असेल तर त्यांना अजित पवारांची राष्ट्रवादी किंवा महाविकास आघाडीतील घटक पक्ष हे दोनच पर्याय उपलब्ध आहे.

# पुण्यात ठाकरे शिवसेना आणि काँग्रेस एकत्र लढणार..; सतेज पाटील-सचिन अहिर यांच्याकडून शिक्कामोर्तब

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या युती आणि आघाड्यांच्या हालाचालींना वेग आला आहे. पुणे महापालिकेत शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेस एकत्र निवडणूक लढवणार असल्याचे निश्चित झाले आहे. यासंदर्भात पुण्यात शिवसेना नेते सचिन अहिर आणि काँग्रेस नेते सतेज पाटील यांची संयुक्त पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत शिवसेना आणि काँग्रेस पुणे महापालिका निवडणुकीला एकत्रित सामोरे जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले. रविवारी रात्री दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीनंतर पत्रकार परिषेदतून ही मोठी घोषणा करण्यात आली.



काँग्रेस नेते सतेज पाटील आणि ठाकरे गटाचे नेते सचिन अहिर यांनी पुणे महापालिका निवडणूक सोबत लढवणार असल्याचे जाहीर केलं. यावेळी जागावाटपाची देखील घोषणा करण्यात आली. पुणे महापालिकेत काँग्रेस ६० जागांवर लढणार असून ठाकरेसेना ४५ जागांवर आपले उमेदवार रिंगणात उतरवणार आहे. पण हा आकडा प्राथमिक असून आज सांयकाळपर्यंत फायनल यादी जाहीर केली जाईल. तसेच, उर्वरित जागांबाबत पुन्हा चर्चा करून निर्णय घेतला जाईल. याशिवाय राज ठाकरे यांच्या मनसेलाही सोबत घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. असं सतेज पाटील यांनी सांगितलं. तर, वंचित बहुजन आघाडीसोबतही आमची सकारात्मक चर्चा सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केलं. पुण्यात रविवारी रात्री ठाकरे गटाच्या शिवसेनेचे नेते सचिन अहिर आणि काँग्रेसचे सतेज पाटील यांच्यात बैठक पार पडली. याचवेळी मनसेच्या नेत्यांनीही या दोन्ही नेत्यांची भेट घेतली. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तिन्ही पक्षांमध्ये ही महत्त्वाची चर्चा झाली असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र मनसेची भूमिका अद्याप अंतिम झालेली नसून चर्चेची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, यावेळी सतेज पाटील यांना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीसोबत सुरू असलेल्या चर्चेबाबत विचारण्यात आले. यावर, आम्ही गाफील नव्हतो आम्ही दक्ष होतो. आमच्या अंतर्गत चर्चा सुरू होत्या. मनसेसोबत अजूनही चर्चा सुरु आहेत. दुपारपर्यंत सगळं स्पष्ट होईल, अशी माहिती सतेज पाटील यांनी दिली.

# राष्ट्रीय महामार्गासाठी अतिक्रमण नोटिसा; मोबदला रखडल्याने भोरमध्ये संताप

**भोर । प्रतिनिधी**

पंढरपूर- शिंदेवाडी- भोर-महाड या राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रगतीपथावर असताना भोर नगरपरिषदेने महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढून घेण्याबाबत मालमत्ताधारकांना नोटिसा दिल्या आहेत. मात्र, रस्त्यासाठी गेलेल्या जागेचा मोबदला अद्याप मिळालेला नसल्याने रामबाग ते महाड नाका परिसरातील नागरिकांनी तीव नाराजी व्यक्त केली आहे. या मागणीसाठी नागरिकांनी शुक्रवारी (दि. २६) भोर मुख्याधिकारी गजानन शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले.



पुणे-सातारा महामार्गावरील शिंदेवाडी (ता. खंडाळा, जि. सातारा) ते वरंधा घाट-महाड हा मार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित करण्यात आला असून, या मार्गाचे सिमेंट काँक्रीटचे काम सध्या सुरू आहे. या महामार्गाच्या भोर नगरपरिषदेच्या हद्दीतील रामबाग ते महाड नाका या टप्प्यातील अतिक्रमणे काढून घेण्याचे आदेश नगरपालिका प्रशासनाने दिले आहेत. रस्त्याच्या हद्दीपासून इमारत रेषा व नियंत्रण रेषा ३ ते ६ मीटर अंतरावर असणे बंधनकारक असल्याने या मर्यादेतील अतिक्रमणे हटविण्याचा उल्लेख नोटिसांमध्ये करण्यात आला आहे. मात्र, या परिसरातील अनेक रहिवाशांना रस्त्यासाठी गेलेल्या जागेचा मोबदला अद्याप मिळालेला नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली आहे. चौपाटी व रामबाग परिसरातील नागरिकांनी मुख्याधिकारी गजानन शिंदे यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या. या वेळी संजय गोळे, चंद्रकांत राजीवडे, युवराज शेटे, सविता कोठावळे, नीलेश देशमाने, शुभम शेटे, बाळासाहेब देशमाने, प्रसाद देशमाने आदी उपस्थित होते. नागरिकांनी सांगितले की, काही घरे १०० वर्षांहून अधिक जुनी असून राष्ट्रीय महामार्गाच्या आखलेल्या सीमारेषेमुळे ती पाडण्याची वेळ येणार आहे. तसेच काही ठिकाणी रस्त्यासाठी जागा अधिग्राहित करण्यात आली असली तरी त्याचा मोबदला मिळालेला नाही. शिवाय प्रॉपर्टी कार्डमध्ये संबंधित जागा अद्याप नागरिकांच्याच नावावर असल्याचे दिसून येते. जर मोबदला देण्यात आला असेल, तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे नाव प्रॉपर्टी कार्डवर का नोंदवले गेले नाही, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला. मोबदला दिला असल्याचे पुरावे असल्यास त्याची कागदपत्रे नागरिकांना उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही या वेळी करण्यात आली.

# साखर उताऱ्यात श्री छत्रपती कारखान्याची बाजी

भवानीनगर: यावर्षीच्या गाळप हंगामामध्ये श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने माळेगाव सहकारी साखर कारखान्याला साखर उताऱ्यात मागे टाकून आघाडी घेतली आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्यापेक्षा ०.१६ टक्के जास्त साखर उतारा श्री छत्रपती कारखान्याने मिळवला आहे.



साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू झाला की जिल्ह्यातील सोमेश्वर, माळेगाव व श्री छत्रपती या साखर कारखान्यांच्या गाळपाकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागते. जिल्ह्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांमध्ये सोमेश्वर, माळेगाव आणि श्री छत्रपती कारखाना हे तीन साखर कारखाने उसाचे गाळप, साखर उत्पादन व साखर उतारा मिळवणे यामध्ये आघाडीवर असतात. त्यामुळे या साखर कारखान्यांकडे ऊस उत्पादकांचे लक्ष लागलेले असते. साखर उताऱ्यामध्ये मागील अनेक वर्षापासून नेहमीच पिछाडीवर असणाऱ्या श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने यावर्षी माळेगाव साखर कारखान्यापेक्षा जास्त साखर उतारा मिळवून जिल्ह्यामध्ये दुसऱ्या क्रमांक मिळावला आहे. साखर उताऱ्याच्या बाबतीत सोमेश्वर कारखाना जिल्ह्यामध्ये प्रथम क्रमांकावर असून या कारखान्याने सरासरी ११.१० टक्के साखर उतारा मिळवलेला आहे. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये दुसऱ्या क्रमांकाची आघाडी मिळवत १०.८५ टक्के सरासरी साखर उतारा मिळवला आहे. गाळप हंगामाच्या सुरुवातीला माळेगाव सहकारी साखर कारखाना साखर उताऱ्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर होता, परंतु डिसेंबर महिन्यामध्ये श्री छत्रपती कारखान्याने साखर उताऱ्यामध्ये आघाडी घेत डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात माळेगाव कारखान्यापेक्षा ०.१६ टक्क्याने साखर उतारा जास्त मिळवला आहे. माळेगाव कारखान्याने १०.६९ टक्के सरासरी साखर उतारा मिळवला आहे. जास्तीत-जास्त साखर उतारा मिळवण्यासाठी सोमेश्वर सहकारी साखर कारखाना व श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना यांच्यामध्ये स्पर्धा निर्माण झालेली आहे. श्री छत्रपती कारखान्यापेक्षा सोमेश्वर कारखान्याचा साखर उतारा ०.२५ टक्क्याने जास्त आहे. श्री छत्रपती कारखान्याची जास्तीत-जास्त साखर उतारा मिळवण्याची घोडदौड जोरात सुरू असून, आता लवकरच श्री छत्रपती कारखाना सोमेश्वर कारखान्याच्या साखर उताऱ्याच्या जवळ येणार आहे. २८ डिसेंबरला सोमेश्वर कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.९८, माळेगाव कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.८५ व श्री छत्रपती कारखान्याला दैनंदिन साखर उतारा ११.५९ मिळाला आहे.

# पुण्यात तलवारीच्या धाकाने १.५ कोटींची लूट, दरोडेखोर झाडीत पसार

**पुणे । प्रतिनिधी**

खडकवासला-पानशेत रस्त्यावर असलेल्या खानापूर येथील एका सराफी पेढीवर सशस्त्र दरोडा टाकून चोरट्यांनी १४४ तोळे सोन्याचे दागिने, २० हजारांची रोकड असा एक कोटी ४३ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेल्याची घटना घडली. याप्रकरणी पाच ते सहा दरोडेखोरांविरुद्ध हवेली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका महिलेने हवेली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.



याप्रकरणी पाच ते सहा दरोडेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पसार झालेल्या दरोडेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत.पानशेत रस्त्यावर खानापूर येथे सराफी पेढी आहे. दुपारी साडेबाराच्या सुमारास पाच ते सहा दरोडेखोर सराफी पेढीत शिरले. दरोडेखोरांनी त्यांचे चेहरे रुमालाने झाकले होते. दरोडेखोरांकडे कोयते, तलवारी होत्या. सराफी पेढीतील कर्मचाऱ्यांना शस्त्राचा धाक दाखवून दरोडेखोरांनी ११४ तोळे सोन्याचे दागिने, गल्ल्यातील २० हजारांची रोकड असा एक कोटी ४३ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज लुटून नेला.या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय अधिकारी सुनीलकुमार पुजारी, पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांनी घटनास्थळी भेट दिली. पोलिसांनी सराफी पेढीतील चित्रीकरण तपासले असून, पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यात येत आहे. पोलिसांनी खानापूर परिसरातील ग्रामस्थांची चौकशी केली. दरोडा टाकल्यानंतर चोरटे दाट झाडीतून पसार झाल्याची माहिती ग्रामस्थांनी पोलिसांना दिली.

# राज्य वकील परिषदेचे नेतृत्व पुन्हा पुण्याच्या हाती ; ज्येष्ठ वकील हर्षद निंबाळकर यांची बिनविरोध निवड

**पुणे । प्रतिनिधी**

ज्येष्ठ वकील हर्षद निंबाळकर यांची महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या अध्यक्षपदी तिसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. निंबाळकर हे १९८४ पासून पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात प्रॅक्टीस करत आहेत.



गेल्या चार दशकांहून अधिक काळातील त्यांचा अनुभव आणि वकिलांच्या प्रश्नांसाठीची सातत्यपूर्ण लढाई यामुळे त्यांना परिषदेमध्ये मानाचे स्थान मिळाले आहे. ते पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून, २००४ पासून परिषदेत निवडून आलेले सदस्य आहेत. जुलै २०२४ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना 'ज्येष्ठ वकील' म्हणून पदनाम दिले आहे. हे पदनाम मिळवणारे ते पुण्यातील पहिले वकील ठरले आहेत. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विधी विभागाचे अधिष्ठाता (डीन) म्हणून कार्यरत आहेत. वकिलांच्या हितासाठी त्यांनी अनेक परिषदांचे, चर्चासत्रांचे आणि प्रशिक्षण उपक्रमांचे आयोजन केले आहे. तरुण वकिलांसाठी मार्गदर्शन, ज्येष्ठ वकिलांच्या प्रश्नांवर तोडगा आणि बार-बेंच संबंध दृढ करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. यापूर्वी परिषदेच्या अध्यक्षपदी ड. अहमद खान-पठाण यांची नियुक्ती झाली होती.

# राजगड तालुक्यात चौशिंग्या हरिण शिकार प्रकरणी वनविभागाकडून चार जणांना अटक; आरोपींकडून हत्यारे व मांस जप्त!

**पुणे । प्रतिनिधी**

आंबेगाव वनपरिमंडळातील वेल्हा वनपरिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या ओसाडे (ता.राजगड) येथे वन्यप्राण्यांची शिकार केल्याप्रकरणी वनविभागाने मोठी कारवाई करत चार शिकाऱ्यांना ताब्यात घेतले आहे. ही कारवाई रविवार (ता.२९) रोजी करण्यात आली असून न्यायालयात हजर केले असता आरोपींना पाच दिवसाची पोलीस कोठडी दिली असल्याची माहिती राजगड तालुक्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे यांनी दिली.



समीर वसंत पिलाणे व गणेश बबन लोहकरे दोघेही (रा. ओसाडे,ता.राजगड), नवनाथ चंद्रकांत पवळे (रा. सोनापूर) आणि पांडूरंग दत्तात्रय कदम (रा. निगडे मोसे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये आरोपींकडून चौसिंगा या वन्यप्राण्याचे मांस व शिकार करण्यासाठी वापरण्यात आलेली हत्यारे जप्त करण्यात आली आहेत.

या प्रकरणी वनरक्षक राजेंद्र निंभोरे यांनी फिर्याद दिली आहे. यावरून वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील कलम २(१), ९, ४८(ए), ४९, ५० व ५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा अजामीनपात्र व दाखलपात्र गुन्हा नोंदवण्यात आला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी अनिल लांडगे यांनी वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा दिला आहे. ही कारवाई पुणे वनविभागाचे उपवनसंरक्षक महादेव मोहिते व शीतल राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली अनिल लांडगे वन परिमंडळ अधिकारी स्मिता अर्जुन, दया डोमे, वैशाली हाडवळे ,मंजुषा घुगे ,वनरक्षक राजेंद्र निंभोरे, ए.आर.सोनकांबळे, एस.एन.कांबळे, यांच्यासह इतर वेल्हा वनपरिक्षेत्रातील संयुक्त पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# मोटेवाडी येथे विद्युत शॉक बसल्याने तरुण मजुराचा दुर्दैवी मृत्यू

**न्हावरे । प्रतिनिधी**

शिरुर तालुक्यातील मोटेवाडी येथे सुरु असलेल्या कामादरम्यान अचानक विद्युत शॉक लागून एका तरुण मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवार, २७ डिसेंबर रोजी दुपारी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या मयत तरुणाचे नाव भरत महादेव उघडे (वय २९, सध्या रा. कात्रज, पुणे; मूळ रा. पाचवड, ता. परांडा, जि. धाराशिव) असे असुन तो मजुरीचे काम करत होता. मोटेवाडी (ता. शिरुर, जि. पुणे) येथे दुपारी साडेबाराच्या सुमारास विजेचे काम सुरु असताना त्यांना अचानक विद्युत शॉक बसला.

या घटनेनंतर सहकाऱ्यांनी त्यांना तातडीने शिरुर येथील एका खाजगी हॉस्पिटमध्ये येथे उपचारासाठी दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तपासणीपुर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या प्रकरणी मयताचा भाऊ बाबासाहेब महादेव उघडे (वय ३५, व्यवसाय मजुरी, सध्या रा. म्हैसगाव साखर कारखाना, माढा, जि. सोलापूर) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली आहे. शिरुर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार मोरे या घटनेचा पुढील अधिक तपास करत आहेत.

# लिंगाळीत १७ दुचाकी वाहने व १ कार जाळण्यात आली; दौंड पोलिसांकडून तपास सुरू!

**दौंड । प्रतिनिधी**

येथील एका अपार्टमेंट मधील १७ दुचाकी वाहने, १ कार व २ सायकली जाळण्यात आल्या आहेत. अज्ञाताने वाहने पेटविल्यानंतर अपार्टमेंटच्या मीटर बॉक्स मधील वायरिंग जळाल्याने इमारत अंधारात आहे. दौंड - लिंगाळी रस्त्यावर बर्फ फॅक्टरीच्या पुढे उजव्या हाताला असलेल्या कल्पतरू अपार्टमेंट येथे ही आग लागली होती. मध्यरात्री एक वाजता अपार्टमेंटच्या ऋ बीऋ विंग मधील लोकांना पार्किंग मधील वाहनांना आग लागल्याचे लक्षात आले. आगीमुळे पार्किंगचे पूर्ण प्लास्टर गळून खाली पडले तर शेजारील पत्र्याची देखील शेड काळी पडली. आगीचे लोळ पसफ्लॅटधारकांनी पाणी मारून आग विझविली परंतु त्या आधीच बहुतांश वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्या होत्या. नागरिकांनी वेळीच आग विझविली नसती तर अनर्थ घडला असता. आगीत १७ दुचाकी वाहने व २ सायकली पूर्णपणे जळाल्याने त्यांचा फक्त सांगाडा उरला आहे. अपार्टमेंट मध्ये राहणारे बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंबातील असून त्यांनी कर्जावर ही वाहने खरेदी केलेली आहेत. त्यापैकी बहुतांश वाहनांचा



विमा कालावधी संपला होता.

संरक्षक भिंत व प्रवेशद्वार असणार्या अपार्टमेंटमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा नाही. अपार्टमेंट मधील आगीत राकेश पाटील यांची टाटा नॅनो कार जळाली. तर अनुप दिनेश थोरात, दिलीप कुमार चौधरी, विशाल संसारे, श्रीदेवी अरविंद जोशी व साफिया हमीद तांबोळी यांच्या प्रत्येकी दोन दुचाकी वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. तर मेघा विनोद बनसोडे, विनोद दौलतराव बनसोडे, रमेश नाना मेरगळ, सिध्दराम ओगे, असगर शेख, अश्विनी महामुनी, नीलेश शिर्के यांचे प्रत्येकी एक दुचाकी वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. अज्ञाताकडून अपार्टमेंटच्या पार्किंग मध्ये लावण्यात आलेल्या या दुचाकी वाहने इंधन टाकून जाळण्यात आल्याची प्राथमिक माहिती आहे. दौंड पोलिसांच्या एका पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. आगीत अपार्टमेंटची वायरिंग जळाल्याने वीजपुरवठा खंडित आहे. आगीत पाण्याचे व सांडपाण्याचे पाइप वितळले आहेत. वीजपुरवठा नसल्याने पाण्याच्या वापरावर मर्यादा आल्या असून फ्लॅटधारक हतबल झाले आहेत. दौंड पोलिस ठाण्यात हनीफ हमीद तांबोळी यांनी या प्रकरणी फिर्याद दाखल केली आहे, अशी माहिती ठाणे अंमलदार महेंद्र गायकवाड यांनी दिली. पोलिस उप निरीक्षक अविनाश गायकवाड पुढील तपास करीत आहेत.



# रुपाली चाकणकर यांना न्यायालयात खेचणार; रोटीतील महिलांचा संतप्त इशारा

**पाटस । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील रोटी येथील ग्रामदैवत श्री रोटमलनाथ मंदिरात होत असलेल्या ऐतिहासिक पारंपरिक जावळ विधी कार्यक्रमाच्या संदर्भात राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी कारवाई करण्याच्या आदेशामुळे दौंड तालुक्यातील शितोळे-देशमुख घराण्यातील महिला संतप्त झाल्या आहेत. रोटी येथील पार पडलेल्या निषेध सभेत चाकणकर यांनी माफी मागावी अन्यथा त्यांना न्यायालयात खेचू, असा इशारा महिलांनी दिला आहे.

दौंड तालुक्यातील रोटी येथील श्री रोटमलनाथ मंदिरात पडणाऱ्या पारंपरिक जावळ विधीत महिलांना जबरदस्तीने मुंडन करून विद्रूप केले जाते. या प्रकरणाची चौकशी करून सात दिवसात कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पुणे जिल्हाधिकारी यांना नुकतेच दिले होते. महिला आयोगाचे अध्यक्ष चाकणकर यांनी घेतलेल्या भूमिकेचा तीव्र पडसाद दौंड तालुक्यात आणि रोटी गावात उमटले आहेत. तर मागील दोन दिवसांपासून समाज माध्यमावर चाकणकर यांचा निषेध करणाऱ्या पोस्ट व्हायरल झाल्या आहेत. रविवारी दि (२८) रोटी येथील रोटमलनाथ मंदिर जवळ तालुक्यातील शितोळे-देशमुख परिवाराच्या वतीने निषेध सभा पार पडली. या निषेध सभेत शितोळे घराण्यातील अनेक मान्यवरांनी जावळ विधी परंपरा काय आहे आणि ते कधीपासून रूढ आहे याचाही ऐतिहासिक दाखले देत रूपाली चाकणकर यांचा निषेध केला.